दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.


▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : ३०२ वा ▶ सोमवार दि. २८ ऑगस्ट २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

## चांद्रयान-३ च्या विक्रम लँडरने पहिले निरीक्षण पाठवले

**बंगळुरू ।** भारतीय अवकाश संशोधन संस्था म्हणजेच इस्त्रोकडून चांद्रयान ३ मोहिमे संदर्भात अपडेट्स देण्यात येत आहेत. २३



ऑगस्ट रोजी चांद्रयान तीन हे चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरवण्यात भारताला यश आलं. इस्त्रोनं निर्धारित केलेल्या नियोजनानुसार विक्रम लँडर मधून बाहेर पडून प्रज्ञान रोवर कडून चंद्राच्या दक्षिण ध्रुवावरील परिस्थितीचा अभ्यास सुरू आहे. प्रज्ञान रोवर यावर विविध उपकरणे लावण्यात आलेली आहेत. या उपकरणाकडून चंद्राच्या तापमानासंदर्भात अपडेट इस्त्रोला देण्यात आली आहे.

# वृक्षप्रेमाने झपाटून सुभानदादा पिंजारी करताहेत म्हसदी गावासह रान हिरवेगार

### स्वखर्चाने हजारो वृक्षांची लागवड





एखादे वेड मनाशी लागले की त्याच वेडाने भारावून स्वतःला त्यात पूर्णपणे गुंतवून घेत समर्पित भावनेने काम करणाऱ्या व्यक्तीला सुरुवातीला समाज वेड्याच्या गणतीत काढतो. पण याकडे लक्ष न देता एकाच धेय्याने झपाटून काम करणाऱ्या व्यक्तींच्या हातून असे काही लक्षवेधी काम घडून जाते की त्यांना सुरुवातीला वेडे ठरविणारा समाजच त्यांना डोक्यावर घेऊन मिरवत त्यांच्या कौतुकाचे सोहळे साजरे करतो. असेच फार मोठे पवित्र कार्य साक्री तालुक्यातील म्हसदी येथील सुभानदादा पिंजारी यांच्या हातून घडत असून ते गावासह पंचक्रोशीत प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणून चर्चिले जात आहेत. त्यांचे कार्य सर्वांसाठीच अनुकरणीय ठरले आहे. सुभानदादांनी वृक्षप्रेमाने भारावून स्वतःला वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धन या कामात झोकून देत हजारो वृक्ष लावून ते जगविण्याची किमया साधत म्हसदी गावासह परिसर व रान हिरवेगार करून दाखविले आहे. सुभानदादांचा हा थोडक्यात कार्यवेध... निसर्गाविषयी आत्मीयता, सामाजिक भान व जाणीव यातून सुभानदादा पिंजारी यांना गेल्या अनेक वर्षांपूर्वी वृक्षलागवडीच्या कामाला सुरुवात केली.स्वतः रोपे विकत आणून त्याची लागवड करणे, खत घालणे व लावलेल्या झाडाला नियमितपणे पाणी देऊन ते जगविणे, त्याची देखभाल करणे हा त्यांचा दिनक्रम बनला. सुरुवातीला त्यांना काहींनी वेडात काढले. हे फॉरेस्टवाल्यांचे, वनीकरण विभागाचे काम हा वेडा माणूस स्वखर्चाने का करतो म्हणत लोकांनी हसण्यावर घेतले. सुभानदादांनी मात्र याकडे लक्ष न देता केवळ आपल्या धेय्यावर लक्ष केंद्रित करुन आपले काम नियमितपणे सुरु ठेवले. झाड लावण्यायोग्य जागा दिसली की तिथे झाड लावायचे व त्याला खतपाणी घालून देखभाल करीत ते जगवायचे या श्रद्धकार्याने 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' हा संतविचार त्यांनी कृतीत आणला. रस्त्याच्या दुतर्फा बाजूंनी, गावातील स्वामी समर्थ मंदिर, विविध जातीधर्मातील देवीदेवतांची मंदिरे, शाळा, गावठाण परिसर अशा अनेक ठिकाणी त्यांनी विविध जातींची झाडे लावून ती जगविली. झाडांना लेकरांसारखे सांभाळत, वाढवत त्यांना मोठे केले. त्यांच्या या कार्याने समाजाचे लक्ष वेधले गेले. सुभानदादांना लोक मानायला लागले. त्यांचा आदरसत्कार होऊ लागला. सर्व जातीधर्मातील लोक सुभानदादाच्या कामाचा उदोउदो करू लागले. सुभानदादांनी म्हसदीचे ग्रामदैवत धनदाई देवीचा मंदिर परिसर व मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यालगत वृक्षलागवड केल्याने त्यांचे नाव पंचक्रोशीत चर्चिले जाऊ लागले. यातूनच सुभानदादांचा कार्यविस्तार वाढत गेला. सुभानदादांच्या कामाची दखल घेऊन गावातील व गावातून थेट विदेशात गेलेल्या काही दानशूरांनी त्यांना मदत दिली. या मदतीतून सुभानदादांचे काम मोठ्या स्वरूपात दिसू लागले.



**कार्यगौरव**
**सचिन बागुल**
सहसंपादक
मो.८४२१२२७९२८

अलीकडेच काही वर्षांपूर्वी गावात दुष्काळ पडला होता. पावसाचे पाणी गावालगतच्या पांझरा नदीतून वाहून गेले. पावसाचे पाणी गावालगतच्या पांझरा नदीतून वाहून गेले. विहिरींनी तळ गाठला. त्या पूर्णपणे आटल्या. २० दिवस गावाला पाणी मिळाले नाही. पाण्यासाठी गाव भटकंती करीत राहिले. सुभानदादांनी अशा वेळी गावकऱ्यांच्या मदतीने नदीचे खोलीकरण करून दोन बंधारे बांधले. पुढे झालेल्या पावसाने हे दोन्ही बंधारे भरले. विहिरींची पाण्याची पातळी ५० ते ६० फुटांपर्यंत वाढली. सुभानदादांच्या कर्मपुण्याईने गावाला रोज गावातील कब्रस्तानमध्ये असलेल्या विहिरीतून आज पाणीपुरवठा केला जात आहे. ही विहीर सुभानदादांच्या राष्ट्रीय एकात्मतेची मिसाल ठरली आहे. याच कब्रस्तानमध्ये सुभानदादांनी मोठ्या प्रमाणावर रोपे तयार केली असून संपूर्ण कब्रस्तान भरगच्च वृक्षराजींनी बहरला आहे. येथे विविध जातींची मोठमोठी झाडे असून इथे गेल्यावर थंडगार निसर्गाचा सुखद अनुभव येतो. याशिवाय सुभानदादांनी गावातून विविध गावांकडे जाणाऱ्या रस्त्यांच्या दुतर्फा तसेच थेट जंगल हद्दीत जाऊन वृक्षलागवड करून ते वाढविले आहेत. काही शेतकऱ्यांच्या शेतात देखील त्यांनी झाडे लावून दिली आहेत. गावाशेजारील असलेले डोंगर हिरवेगार करण्याचा विडा आता सुभानदादांनी उचलला आहे. त्यासाठी रस्ता कामाची मंजुरी देखील ट्युण्णी शासनाकडून मिळवून आणली आहे. त्यासाठी शासकीय निधीची गरज आहे. आतापर्यंत सुभानदादांच्या कार्याला अनेकदा गौरविण्यात आले आहे. परंतु शासन स्तरावर ना त्यांची दखल घेतली ना कुठला मानसन्मान मिळाला. सुभानदादांना याबद्दल काहीच खंत वाटत नाही व वृक्षारोपणाचे फोटोछाप कामही ते करीत नाहीत. सुभानदादांच्या या निस्वार्थ निसर्गसेवेच्या व मानवतावादी कामाला शासनाची मदतरूपी साथ मिळाली तर जगाचे लक्ष वेधू शकेल असे निसर्गाचे आदर्श मॉडेल साकारण्याची जिद्द सुभानदादांमध्ये आहे.

### या पत्रकारांनी जाणून घेतले सुभानदादांचे कार्य

**सुभानदादा पिंजारी यांच्या कार्याविषयी माहिती घेऊन धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष रवींद्र इंगळे, मिलिंद बैसाणे, चंद्रशेखर पाटील, विद्यमान उपाध्यक्ष मनोज गर्दे, सचिव सचिन बागुल, सुभाष वाघ यांनी म्हसदी गावास भेट देत सुभानदादांचे कार्य जाणून घेतेले. यावेळी रावसाहेब गुंजाळ, सूर्यवंशी सर यांच्यासह मुस्लिम पंच कमिटी व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते कब्रस्तान परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.**

# २०२४ मध्ये निवडणुका जिंकण्यासाठी केंद्रातील मोदी सरकार देशात दंगली घडवू शकते

## उद्धव ठाकरेंचा गंभीर आरोप

**हिंगोली । प्रतिनिधी**

२०२४ मध्ये निवडणुका जिंकण्यासाठी केंद्रातील मोदी सरकार देशात दंगली घडवू शकते, याकडे लक्ष द्या. राममंदिरांच्या उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने देशभरातून हिंदू लोकांना आमंत्रित केले जाणार आहे. पण हा सोहळा झाल्यानंतर हिंदू घरी परतताना एखाद्या मुस्लिम भागात हिंदू-मुस्लिमांमध्ये दंगली घडवून आणल्या जाऊ शकतात, अशी शंका उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली आहे.

राज्यात दुष्काळ आहे आणि देवेंद्र फडणवीस जपानमध्ये आहेत. टरबूजालाही पाणी लागते असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी फडणवीस यांचे नाव न घेता टरबूज असा उल्लेख केला. फडणवीस यांना मी बोलणे सोडले मागे मी त्यांना कलंक बोललो,त्यांना फडतूस गीडतुस बोललो तर बोबाटा झाला. आता मी त्यांना थापाड्या म्हणणार होतो पण त्यांना आता थापाड्या म्हणत नाही, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी फडणवीस यांच्यावर जोरदार टिका केली.

उद्धव ठाकरे यांनी हिंगोलीतील जाहीर सभेतून एकनाथ शिंदे गटावर नाव न घेता हल्लाबोल केला आहे. मी गद्दारावर वेळ घालनार नाही. मी तुमच्याशी बोलायला आलो आहे, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी शिंदेवर हल्लाबोल केला. शिवसेनेच्या फुटीनंतर मराठवाड्याच्या हिंगोलीमध्ये शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची पहिलीच निर्धार सभा आयोजित करण्यात आली. हिंगोलीच्या ऐतिहासिक रामलीला मैदानावरून या सभेला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी संबोधित केलं. सभेत बोलताना उद्धव ठाकरेंनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली. हिंगोलीतील रामलीला मैदानावरून उद्धव ठाकरे म्हणाले, ' शंभूदेवाला प्रार्थना करतो की, शेतकऱ्यांसाठी भरभरून दे. शेतकऱ्यांवर अवकृपा होऊ देऊ नको. काही जणांना अपेक्षा आहे, मी गद्दारपणावर बोलेन. पण मी त्यांच्यावर बोलून वेळ वाया घालवणार नाही. मी तुमच्यासाठी आलो आहे. गद्दारासाठी आलो नाही'. श्रावण महिना सुरू झाला आहे. नागपंचमी झाली. गद्दारांना साप समजून पूजायाला लागलो. पायाखाली साप आला तर शेतकऱ्यांना काय करायचं हे माहीत आहे.



### 'हे कसले हिंदू, याला नामर्द म्हणतात'

**सरकारवर आणि भाजपवर टीका करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, डबल इंजिन सरकार आणि आता त्यात अजितदादांचा एक डबा लागला आहे. अजून किती डबे लागणार आहेत? मालगाडी होतेय यांची. तुमच्या पक्षात कर्तृत्व नाही? तुम्हाला नेते माझे लागतात, वडील माझे लागतात, पक्ष फोडला, पक्ष सोडला वडील माझे वापरायचे. का तुमच्या दिल्लीतील वडिलांकडे मते मागायची हिंमत राहिली नाही? चोरणार माझे वडील, इतर पक्षातील नेते चोरणार आणि म्हणणार आम्ही हिंदू आहोत. अरे कसले हिंदू, याला नामर्द म्हणतात. ही नामर्दांगी आहे.**

### फडणवीस यांचं नाव न घेता टरबूज असा उल्लेख

**हिंगोलीतील निर्धार सभेत उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जोरदार टीका केला. फडणवीस यांना मी बोलणं सोडलं मागे मी त्यांना कलंक बोललो, त्यांना फडतूस बोललो तर बोभाटा झाला. आता मी त्यांना थापाड्या म्हणणार होतो पण त्यांना आता थापाड्या म्हणत नाही, असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी फडणवीस यांच्यावर टीका केली. शिवाय राज्यात दुष्काळ हे आणि देवेंद्र फडणवीस जपानमध्ये आहेत. टरबूजालाही पाणी लागतं, असं म्हणत ठाकरे यांनी फडणवीस यांचं नाव न घेता टरबूज असा उल्लेख केला.**

# प्रेमसंबंधातून तरुणी गर्भवती; प्रियकराने जबरदस्तीने केला गर्भपात

### तरुणीने रुग्णालयातच सोडले प्राण!

**धुळे । प्रतिनिधी**

शिरपूर तालुक्यातील एका युवतीचा बळजबरीने गर्भपात करुन तिच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याच्या संशयावरुन धुळे येथील फाशी पुलावरील तुषार हॉस्पिटलचे संचालक डॉ. एम. एस. रघुवंशी यांच्यासह युवकाविरोधात शिरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

शिरपूर तालुक्यातील एका युवतीचा बळजबरीने गर्भपात करुन तिच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याच्या संशयावरुन धुळे येथील फाशी पुलावरील तुषार हॉस्पिटलचे संचालक डॉ. एम. एस. रघुवंशी यांच्यासह युवकाविरोधात शिरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.गर्भपात करताना निष्काळजीपणा केल्यामुळे पीडित तरुणीच्या गर्भाशयात गंभीर जखम होऊन रक्तस्त्राव झाला. रक्त साठून राहिल्याने इन्फेक्शन झाले. त्यानंतर काही दिवसांनी तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. दरम्यान, नुकत्याच आलेल्या पोस्टमार्टम रिपोर्टमध्ये तिच्या मृत्यूचे कारण समोर आले. तिच्या वडिलांना मोठ्या मुलीने घडल्या प्रकाराची माहिती दिली. त्यानंतर वडिलांच्या फिर्यादीवरुन संशयित आरोपी अमृत पाटील व धुळ्यातील डॉ. रघुवंशी यांच्याविरोधात शिरपूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. मृत मुलीच्या वडिलांनी येथील न्यायालयात तक्रार दिली होती. गेल्या वर्षी ही घटना घडली. गेल्या १ नोव्हेंबरला त्यांच्या मुलीचे पोट दुखत होते. त्यांनी याबाबत तिच्याकडे विचारपूस केल्यावर तिने आपण गर्भपात केल्याचे सांगितले. दुखणे वाढल्यामुळे तिला शहरातील खासगी रुग्णालय व तेथून धुळे येथील हिरे वैद्यकीय महाविद्यालयात पाठवण्यात आले. ४ नोव्हेंबरला उपचार घेत असताना तिचे निधन झाले. शहर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली. मृत मुलीचा शवविच्छेदन अहवाल पोलिसांना देण्यात आला. त्यात गर्भाशयाला कट लागल्याने रक्तस्त्राव होऊन पोटात रक्त साचल्याने विषाणू संसर्ग होऊन तिचा मृत्यू झाल्याचे नमूद केले होते. त्यानंतर मृत मुलीचे वडील घरी गेल्यानंतर त्यांना त्यांच्या मोठ्या मुलीने माहिती दिल्यावर या प्रकाराचा उलगडा झाला. २० ऑक्टोबरला कपडे घेण्यासाठी ती लहान बहिणीसह बाहेर गेली होती. त्या वेळी त्यांना संशयित अमृत आनंदा पाटील (वय २९, रा. उपरपिंड, ता. शिरपूर) याने धुळे येथील तुषार हॉस्पिटलमध्ये बळजबरीने बोलावून घेतले.

## सराईत गुन्हेगाराकडून गावठी कट्टा हस्तगत


**धुळे ।** कमरेला गावठी कट्टा बाळगून फिरत असताना देवपुरात राहणारा भावेश मिलिंद जोशी (वय ३०) या तरुणाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा लावून पकडले. ही कारवाई चाळीसगाव रोड परिसरात केल्याची माहिती पोलिस अधीक्षक संजय बारकुंड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

चाळीसगाव रोडवर एक तरुण गावठी कट्टा बाळगून विक्री करण्याच्या उद्देशाने फिरत असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक हेमंत पाटील यांना मिळाली. माहिती मिळताच पथकाला रवाना करण्यात आले. चाळीसगाव रोडवरील एकता सर्कल भागात एक तरुण संशयास्पदरीत्या फिरत असल्याचे दिसून आले. त्याची चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसांना संशय आल्याने पोलिसांनी तरुणाला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता त्याने त्याचे नाव भावेश मिलिंद जोशी असल्याचे सांगितले. त्याची अंगझडती केली असता त्याच्याकडे ४० हजार रुपये किमतीचा गावठी कट्टा मिळून आला. भावेश हा सराईत असून, पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. त्याच्याविरोधात देवपूर पोलिस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियमानुसार दोन गुन्हे दाखल आहेत.

### तरूणीचा अपघाती मृत्यू

**धुळे ।** शहरातील बडगुजर प्लॉट भागातील रहिवासी रचना वंजी राणे (२१) या तरूणीचा काल (दि.२६) सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास अपघाती मृत्यू झाला. रचना हिच्या वडीलांचे यापुर्वी निधन झालेले होते. तर कोरोनाने आईचेही निधन झाल्याने तिचे मातृ-पितृ छत्र हरपलेले होते. त्यामुळे रचना व तिच्या दोन्ही बहिणी आजीकडे राहत होत्या. मात्र आजीचेही निधन झाले होते.

# कानुमातेचे आज विसर्जन



पोलिस मुख्यालय धुळे शहराचे अंमलदार अविनाश रेशिमवाले यांच्या घरी विराजमान झालेली कानबाई मातेची आरास

**धुळे । प्रतिनिधी**

श्रावणातील पहिल्या रविवारी कानुमातेचा उत्सव भाविकांच्या अपार उत्साहात पार पडला. त्यानंतर सलग दुसऱ्या रविवारी देखील शहरासह जिल्ह्यात कानुमातेचा उत्सव साजरा होत आहे. काल (दि.२७) कानुमातेची स्थापना करण्यात आली. तर आज दि. २८ रोजी कानुमातेला निरोप देण्यात येणार आहे.

खानदेशात कानुमातेच्या उत्सवाची परंपरा आहे. श्रावण महिन्यात पहिल्या व दुसऱ्या रविवारी कानुमातेची स्थापना केली जाते. या वर्षी दि. २० ऑगस्ट रोजी शहरासह जिल्ह्यात ठिकठिकाणी कानुमातेचा उत्सव पार पडला. त्यानंतर (दि. २७) देखील जिल्हाभरात हा उत्सव साजरा होणार झाला. (दि. २६) भाजी-भाकरचे रोट पूजन करुन उत्सवाला सुरुवात झाली. कानुमातेचे पारंपरिक महत्त्व लक्षात घेवून प्रथेप्रमाणे कानुमातेची प्रतिष्ठापना करण्यात येईल. पितळी अथवा लाकडी मुखवटा धारण केलेली मूर्ती किंवा श्रीफळाची चौरंगावर स्थापना करून त्यास हिरवे वस्त्र परिधान करून आभूषणांनी सजविण्यात अली. विसर्जनासाठी ठिकठिकाणी मोठी तयारी करण्यात आली आहे. डीजे, बँड व ढोल पथकांना आमंत्रित करण्यात आले आहे.

# श्रावण महिन्यामुळे बाजारात केळीच्या पानांची आवक वाढली

श्रावण महिन्यामुळे बाजारात केळीच्या पानाला मागणी वाढली आहे. शहरात विक्रीसाठी आणून शेतकरी जुलै, ऑगस्ट या दोन महिन्यांमध्ये लाखो रुपयांची उलाढाल करत आहेत. जुलैपासून अनेक सण, उत्सव सुरू होतात. श्रावण आणि भाद्रपद महिन्यांत केळीच्या पानांना विशेष महत्त्व असते. शहरी भागांतील वाढती मागणी विचारात घेऊन मोठ्या प्रमाणात दररोज केळींची पाने शहरात दाखल होत आहेत.

जंगलात जाऊन केळीची पाने विळा, कोयत्याने काढण्याचे काम करतात. एक महिला दिवसभरात ३०० ते ४०० पाने काढते. ही पाने जंगलातून बाहेर काढून सपाटीला माळरानावर आणली जातात. तिथे स्वच्छ वाहत्या पाण्यात धुतली जातात. या पानांचे भारे (गठ्ठे) बांधले जातात. एकेका भाऱ्यात १०० ते १२५ पाने असतात.



**शोध बातमी**
पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.7057011126

एका भाऱ्याचे वजन ५० ते ६० किलो असते. हे भारे डोक्यावरून जंगलातून तीन ते चार किलो मीटरची पायपीट करून शहरात आणले जातात. शहरातील विविध भागात किरकोळ, घाऊक पद्धतीने विकले जातात. एक केळीचे पान पाच ते १० रुपयांना विकले जाते. केळीच्या पानाच्या निमित्त रोजगार मिळतो. लागवडीचा हंगाम संपल्यानंतर बसून राहण्यापेक्षा केळीच्या पानांना श्रावण महिन्यात चांगली मागणी असते. शहरातील लोक या पानांना जेवणासाठी अधिक पसंती देतात. भाद्रपद महिन्यातही या पानांना विशेष महत्त्व असते. पूर्वी भांड्यांच्या ऐवजी केळीच्या पानावर जेवण केले जायचे. केळीच्या पानावर पाणी टिकत नाही, तसेच ते गुळगुळीत असते. त्यामुळे ते नेहमी स्वच्छ असते. म्हणूनच केळीच्या पानांवर जेवण्यास पसंती दिली जायची. भांड्यांत जेवणानंतर ते धुण्या-घासण्याचे कष्ट पडतात आणि त्यासाठी खर्चही येतो. अनेक घरांमधून केळीच्या पानांवर जेवणाला पसंती दिली जात आहे.



**मी २० वर्षांपासून या व्यवसायात आहे. दररोज पहाटे केळीचे गठ्ठे घेते आणि ते विकण्यासाठी सकाळपासून संध्याकाळपर्यंत बाजारपेठेत बसते. पावसाळा सोडला तर आठही महिने मी हाच व्यवसाय करते. यातून उत्पन्नही बऱ्यापैकी भेटते. - बायजाबाई कोल्हे, पानविक्रेत्या**

### सजावटीच्या फुलांना 'भाव'

**पूजेसाठी वापरल्या जाणाऱ्या फुलांना अपेक्षेप्रमाणे मागणी असली, तरी सजावटीच्या फुलांना ही ठराविक कालावधीतच मागणी असते. लग्नसराई, दसरा, दिवाळी या कालावधीपेक्षा गणेशोत्सवात सजावटीची फुले 'भाव' खाऊन जातात.**

### प्लॅस्टिक फुलांचे आव्हान

**सजावटीसाठी प्लॅस्टिकच्या फुलांचा वापर वाढू लागल्याचा फूल व्यापारावर काही प्रमाणात परिणाम झाला आहे. पूजेसाठी लोक ताजी फुले घेतात, परंतु सजावटीसाठी प्लॅस्टिकच्या फुलांचा वापर करतात. सजीव फुलांसारखी दिसणारी प्लॅस्टिकची फुले बाजारात मिळत असल्याने दररोजच्या फुलांच्या मागणीवर परिणाम होत असल्याचे व्यापारी सांगत आहेत.**

## 'बेस्ट' कर्मचाऱ्यांना लवकरच दिलासा


मुंबईतील रस्ते वाहतुकीचा कणा म्हणून बेस्ट उपक्रमाची बस वाहतूक सेवा ओळखली जाते. मात्र गेल्या काही वर्षांपासून बेस्ट सेवेचा दर्जा ढासळत चालला आहे. त्यात कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांच्या पुष्ठ्यर्थ बेस्ट उपक्रमातील कंत्राटी कामगारांनी विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी २ ऑगस्टपासून बेमुदत संपाचे हत्यार उपसले होते. या आंदोलनामुळे सर्वसामान्य कामगार वर्ग आणि प्रवासी वर्ग पिचला गेला होता. लाखो प्रवाशांची होरपळ होत होती. सुमारे १८ आगारांतून केवळ बोटावर मोजण्याइतक्या बस बाहेर पडत होत्या. त्यामुळे बेस्ट बस धावत नसल्याने प्रवाशांना खिशाला न परवडणारा रिक्षा, टॅक्सी, ओला, उबेर यांसारखे मार्ग निवडावे लागले होते. बेस्ट प्रशासन आणि कंत्राटदार यांच्या कात्रीत प्रवासी आणि कंत्राटी कर्मचारी वर्ग सापडला होता. बेस्टमधील कंत्राटी कर्मचारी तुटपुंज्या पगारात राबतात. अवघ्या १० ते १८ हजार रुपये पगारात संसाराचे आर्थिक गणित जुळवणे त्यांना कठीण होऊन बसते. मुलांचे शिक्षण, घरातील ज्येष्ठांचे आजारपण, आपत्कालीन परिस्थितीसाठी तडजोड, सणवारासाठी खरेदी, किराणा सामान, वगैरे बाबींसाठी खर्च करणे कठीण होते. त्यामुळेच बेस्ट उपक्रमातील कंत्राटी कर्मचारी रघुनाथ खजुरकर यांच्या पत्नी प्रज्ञा खजुरकर यांनी आपल्या दोन लहान मुलांना घेऊन उपोषणास सुरुवात केली आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांवरील अन्यायाला वाचा फोडली. वाढत्या महागाईत घर चालवणे शक्य नसल्याने पगारवाढ करावी व इतर मूलभूत सुविधा देण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली. तेथून आंदोलनाची पहिली ठिणगी पडली. या दाम्पत्यासह हजारो बेस्ट कंत्राटी कर्मचारी आपल्या कुटुंबीयांसह कामबंद आंदोलनात सहभागी झाले होते.

बेस्ट उपक्रमाच्या ताफ्यात स्वतःच्या मालकीच्या एकूण १,३९० आणि भाडेतत्त्वावरील १,६७१ अशा एकूण ३,०६१ बसगाड्या आहेत. बेस्टच्या प्रत्येक आगारातून भाडेतत्त्वावरील बस सुटते. बस प्रति किमी जेवढी धावेल, त्यानुसार बेस्ट उपक्रमाकडून कंत्राटदाराला पैसे दिले जातात. त्यामुळे बसमध्ये प्रवासी असोत किंवा नसोत, कोणत्या थांब्यावर बस थांबो अथवा न थांबो, तरीही कंत्राटदाराला त्याचे पैसे मिळत आहेत. या कंत्राटी बसवर कंत्राटी वाहक आणि चालक काम करतात. मात्र त्यांना तुटपुंजा पगार दिला जातो. महिन्याला १८ हजार रुपयांत घर कसे चालवायचे असा प्रश्न या कर्मचाऱ्यांसमोर उभा राहतो. त्यामुळे आंदोलन करून कर्मचाऱ्यांमध्ये 'कंत्राटदार तुपाशी आणि कर्मचारी उपाशी' असल्याची भावना निर्माण झाली होती. ती भावना सकृतदर्शनी अगदी योग्यच म्हणायला हवी, अशी परिस्थिती दिसत आहे. बेस्ट उपक्रमातील कंत्राटदारांच्या माध्यमातून काम करणाऱ्या सर्व बसचालक व बसवाहक यांना बेस्ट उपक्रमात कायमस्वरूपी सामावून घ्यावे. ज्या बसचालकांना, वाहकांना कायम करता येणे शक्य नाही, त्यांना 'समान काम, समान वेतन' देण्यात यावे, बेस्टचा अर्थसंकल्प महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये विलीन करावा, बेस्टचे सर्व बंद बसमार्ग पूर्ववत सुरू करावेत, प्रत्येक बस मार्गावर बसगाड्यांची संख्या वाढवून बसफेऱ्या वाढवाव्या, नादुरुस्त बसगाड्या दुरुस्ती केल्याशिवाय मार्गस्थ करणे बंद करावे, मुंबईसाठी बेस्टच्या मालकीचा ताफा दुप्पट म्हणजेच किमान ६ हजार बसेसचा करावा, अशा मागण्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी प्रशासनानुढे मांडल्या आहेत. बेस्ट उपक्रमातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या या आंदोलनाला बेस्ट प्रशासन आणि कामगार आयुक्त कार्यालय जबाबदार असल्याचा आरोप बेस्ट संघटनेद्वारे केला गेला होता. बेस्ट उपक्रमाने कंत्राटी पद्धतीवर बस गाड्या चालवण्यासाठी परवाना देताना कंत्राटी कामगार (नियमन आणि निर्मूलन) अधिनियम १९७० तसेच, महाराष्ट्र कंत्राटी कामगार (नियमन आणि निर्मूलन) नियम १९७१ अनुसार मालकाने कंत्राटी कामगारास कायम कामगारांप्रमाणे वेतन व भत्ते देण्याची तरतूद कामगार आयुक्त कार्यालय तसेच बेस्ट प्रशासनाच्या निदर्शनास आणली होती; परंतु या दोन्ही यंत्रणांनी या अधिनियमाची पायमल्ली केल्याचा या संघटनांचा आक्षेप आहे. याची योग्य ती दखल आता घेतली जाईल आणि कामगार व त्यांच्या संघटनांच्या सर्व शंका-कुशंकांचे निरसन केले जाईल अशी आशा वाटत आहे.

# परोपकारी, उद्योगरत्न रतनजी टाटा

महाराष्ट्र सरकारने नुकतेच रतनजी टाटा यांना उद्योगरत्न पुरस्काराने सन्मानित केल्याचे वाचून आमच्यासारख्या भारतीयांना आनंद झाला. रतन टाटा हे भारतातील एक उद्योग क्षेत्रातील यशस्वी आणि नामवंत प्रसिद्ध असे व्यक्तिमत्त्व. त्यांनी अनेक कंपन्या विकत घेऊन त्यांना उच्च शिखरावर पोहोचवल्या आहेत. भारतातील सर्वात मोठे बिझनेसमन म्हणून त्यांची संपूर्ण देशातच नव्हे तर परदेशातही ख्याती आहे. त्यांची संपूर्ण देशावर २००४ मध्ये हिंद महासागरांत आलेली सुनामी, २००८ मध्ये मुंबईत झालेला दहशतवादी हल्ला आणि नैसर्गिक आपत्कालीन परिस्थिती उद्भवली किंवा कोविड-१९ सारखे मोठे सर्वप्रथम टाटा हे सर्वात पुढे मदतीला धावत असतात. अगदी देशासाठी नेहमीच आपली संपत्ती मुक्तपणे उधळायची तयारी अद्यापही ठेवतात, अशा आपत्तीमध्ये उद्भवलेल्या परिस्थितीचे निवारणकार्यात ते अत्यंत अग्रेसर असलेल्या रतन टाटा यांचा हा सहभाग सामाजिक कल्याण्यासाठी अत्यंत सहानुभूती व वचनबद्धता दर्शवणारा असाच आहे. त्यामुळे असा आभाळासारख्या मोठ्या मनाचा, हिमालयाच्या उंचीचा हा माणूस आम्हा भारतीयांसाठी एक आदर्श आणि दीपस्तंभसारखे असल्याने प्रत्येक भारतीयांना अशा हिमालयाची उंची असलेल्या कर्मयोगी माणसाचा अभिमान वाटतो.

आपल्याच तन-मन-धनाने मोठी असलेली बनाव करणारी माणसं आपण नेहमीच पाहतो; परंतु ही मंडळी फक्त मोठेपणाचे आव आणणारी, दिखावा करणारी असतात, याबाबत आपल्या पूर्वजांनी केलेल्या अनेक वर्षांच्या म्हणी, वाक्प्रचार पितळ उघडे पडणे याचा प्रत्यय आल्यापासून राहात नाही; परंतु रतनजी टाटा हे आजोबा जमशेदजी टाटा यांचे वडील नवल



टाटा यांच्या संस्कारामुळे रसायन बनल्याने भारताच्या विकासाच्या दृष्टीने हे रसायन कामी आले. भारतामध्येच नव्हे तर त्यांनी त्यांच्या कर्तृत्वाने आणि उत्तम नियोजनामुळे इतर शंभर देशांमध्येही आपला बिजनेस वाढवून भारताचे नांव संपूर्ण जगामध्ये नावारूपाला आणण्याचे असामान्य योगदान त्यांनी दिलेले आहे, असा भारतीय उद्योजक या भारतामध्ये जन्माला आला आणि आज टाटा कंपनी ही एकाच बिझनेसमध्ये न राहता त्यांनी टोमोटीव्ह, रिटेल, रियल इस्टेट, हॉटेल्स लाईफ इन्सुर, ई-कॉमर्स होम अप्लायन्सेस इ. क्षेत्रांत भरीव कामगिरी केलेली असल्यानेच त्यांच्या कंपन्यांची नावेही टाटा पॉवर, टाटा मोटर्स, टाटा स्टील, टाटा केमिकल्स, टाटा कन्सल्टन्सी, टाटा कस्टमर सर्व्हिसेस, टाटा कन्झुमर, टाटा अॅडव्हान्स सिस्टम, टाटा कम्युनिकेशन इ. कंपन्यांनाही आपल्या कार्यकुशलतेने यशोशिखरावर पोहोचविले आहे. सर्वात महत्त्वाचे आणि देशासाठी अभिमानास्पद भावलेली त्यांची गोष्ट अशी आहे की, या सर्व कंपन्या म्हणजे टाटा सूपमधून प्राप्त झालेल्या आर्थिक उत्पन्नापैकी किया कमाल ६५ टक्के हिस्सा हा टाटा चॅरिटेबल ट्रस्टमध्ये दान केले जाते. त्यामुळे त्यांचा जगातल्या श्रीमंतांच्या यादीमध्ये समावेश झालेला नाही. देशातील नागरिकांप्रति त्यांची मनाची श्रीमंती किती मोठी आहे. म्हणजे कितीही माया असली तरी स्वार्थासाठी वापरली जाते, त्यातून त्याचा देखावा जास्त असतो ती कोणाच्याही कामी येत नाही; परंतु रतनजी टाटांच्या मनाच्या श्रीमतीचे उदाहरण प्रत्येक भारतीयांना दिलासा देणारा ठरणारा आहे, यातूनच त्यांच्या मनात भारतातील लोकांबद्दलचं प्रेम, आपुलकी आणि जिव्हाळा दिसतो. पण देश प्रेमाचे जाज्वल्य अभिमान व त्यांची परोपकारी वृत्तीही दिसून येते.

रतनजी टाटांसारखे उद्योग यशस्वी का आणि त्यांच्या यशाच्या मंत्राच्याबाबत त्याबद्दल त्यांचा एक किस्सा नमूद करावासा वाटतो की, सन-२००१ मध्ये टाटा मोटर्सने एक लाख टाटा इंडिका कारची निर्मिती केली. त्यावेळी कर्मचाऱ्यांना शाबासकी व कौतुकाची थाप देण्यासाठी येणार होते; परंतु ते येईपर्यंत कर्मचाऱ्यांना स्ट्रेस मॅनेजमेंटच्या कार्यक्रमाद्वारे प्रशिक्षण संपताना त्यांचे आगमन झाले, त्यावेळी कार्यक्रमासंदर्भात त्यांनी चौकशी केल्यानंतर उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, मी आज अनेक कंपन्यांची जबाबदारी स्वीकारलेली असतानासुद्धा मला अजिबात स्ट्रेस नाही. त्याचे कारण असे आहे, मला माहीत आहे माझे कर्मचारी दिलेली जबाबदारी कामास प्राधान्य देऊन करीत आहेत; परंतु त्यांनाही माहिती आहे की जर कामाप्रती बेजबाबदारपणे वर्तन करणाऱ्यांना मी कामावर ठेवणार नाही. या शिस्तीचे प्रत्येकाने पालन करणे ही प्रत्येक काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचीच आहे. अशा पद्धतीने त्यांनी दिलेली शाबासकीची थाप देऊन सर्वांचे कौतुक करून त्यांना शिस्तीची जाणीवही करून दिली.

आज त्यामुळे टाटा कंपनीची प्रगती आणि रतन टाटा यांचं व्यावसायिक यश आणि यशाचे रहस्यदिसतेय, असे खासगी क्षेत्रांतच शक्य होताना दिसतेय, इतर क्षेत्रांत याचा अभाव असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे रतन टाटा हे एक उत्तम ऊद्योगपती, परोपकारी व गुंतवणूकदार अशा पद्धतीने काम करीत त्यांनी विविध क्षेत्रांवर प्रभाव टाकला आहे. आरोग्यसेवा, शिक्षण, ग्रामीण विकास आणि कला, संस्कृतीवर लक्ष केंद्रित करणाऱ्या टाटा ट्रस्टची स्थापना करून देशातील नागरिकांसाठी महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे, त्यामुळे भारतातील असंख्य व्यक्तीचे जीवन सुधारले आहे.

भारतातील असंख्य लोकांना रोजगार देताना त्यांची तितकीच सर्वार्थाने सुरक्षा त्यांनी पाहिलेली आहे, आपल्या कामगारांनाही त्यांनी वेळोवेळी सर्व मदत करून अनेकांचे जीवही वाचविलेले आहेत, अशा परोपकारी, ऊद्योगरत्न व मोठ्या मनाच्या माणसाला, देवासारखा मदतीला धावून येणाऱ्या अशा देवदूतांस ज्याने भारताचे नाव जगामध्ये उच्च शिखरावर नेले, भारताची कीर्ती जगभरात पसरविली, त्यामध्ये वृद्धीच केली आहे अशा रतनजी नवल टाटा यांचा हा थोडक्यातील मांडलेल्या जीवनचरित्राप्रमाणे, त्यांनी देशवासीयांसाठी, देशासाठी केलेल्या आणि बजावलेल्या अतुलनीय कामगिरीबाबत भारताच्या केंद्र सरकारने त्यांच्या या कार्याची योग्य ती दखल घेऊन रतनजी नवल टाटांना आता कोणताही किंतु परंतु न ठेवता भारतातील सर्वोच्च नागरी सन्मान म्हणून भारतरत्न पुरस्कार बहाल करून त्यांचा यथोचित गौरव करावा यासाठीच समस्त भारतवासीयांच्या वतीने हा लेखप्रपंच.

**- सुनील धाऊ झळके, भिवंडी**

# अमेठी व वाराणसी; काँग्रेसचा जुगार

उत्तर प्रदेश काँग्रेसचे नवनियुक्त अध्यक्ष अजय राय यांनी राहुल गांधींनी अमेठीतून आणि प्रियंका वाड्रा यांनी वाराणसीतून लोकसभा निवडणूक लढवावी, अशी कार्यकर्त्यांची इच्छा असल्याचे म्हटले आहे. राहुल व प्रियंका दोघे बहीण-भाऊ उत्तर प्रदेशातून २०२४ मध्ये होणारी लोकसभा निवडणूक लढणार असल्यास काँग्रेस आपल्या सर्व शक्तिनिशी त्यांच्या पाठीशी उभी राहील, अशीही पुस्ती त्यांनी जोडली आहे. खरोखरच राहुल गांधी हे अमेठीतून आणि प्रियंका वाराणसीतून निवडणूक लढवतील का?, अशी चर्चा पक्षात सुरू आहे. उत्तर प्रदेश हा भाजपचा भक्कम किल्ला आहे. या किल्ल्याचे किल्लेदार मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आहेत. त्यामुळे राहुल आणि प्रियंका हे अमेठी व वाराणसीतून निवडणूक लढविण्याचे धाडस करणार नाहीत असे वाटते. पण त्यांनी खरोखरच लढवायचे ठरवले, तर तो मोठ्ठा जुगार ठरेल.

अमेठीतील मतदारांनी गेल्या वेळी चूक केली, ती चूक त्यांना येत्या लोकसभा निवडणुकीत सुधारायची आहे, म्हणूनच तेथील मतदार व पक्षाचे कार्यकर्ते राहुल गांधी यांनी अमेठीतून निवडणूक लढवावी अशी मागणी करीत आहेत, असे प्रदेशाध्यक्ष अजय राय यांनी म्हटले आहे. अखिल भारतीय काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी गेल्या वेळी (२०१९ मध्ये) उत्तर प्रदेशातील अमेठी आणि केरळमधील वायनाड अशा दोन मतदारसंघांतून निवडणूक लढवली होती. भाजपच्या उमेदवार स्मृती इराणी यांनी त्यांचा अमेठीत पराभव केला. मात्र ते वायनाडमधून लोकसभेवर खासदार म्हणून निवडून आले.

राहुल गांधी अमेठीतून सन २००४, २००९ आणि २०१४ अशा तीन निवडणुकांमधून लोकसभेवर खासदार म्हणून निवडून आले होते. राहुल गांधी यांचे वडील व माजी दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी हे सुद्धा अमेठी मतदारसंघातून लोकसभेवर निवडून गेले होते. गेल्या निवडणुकीत काँग्रेसचा येथे पराभव झाल्यामुळे अमेठीची जागा इंडिया (इंडियन नॅशनल डेव्हलपमेंट इन्क्लुजिव्ह अलायन्स) नावाच्या विरोधी आघाडीतील मित्र असलेला समाजवादी पक्ष काँग्रेसला सोडेल का? हा सुद्धा एक कळीचा मुद्दा आहे. इंडिया या विरोधी आघाडीत काँग्रेस व सपा दोघेही आहेत व लोकसभा निवडणुकीसाठी 'इंडिया'ची उभारणी झाली आहे.


सन २०१७ मध्ये काँग्रेस आणि सपा यांची आघाडी विधानसभा निवडणुकीसाठी झाली होती, पण ती दोन्ही पक्षांना लाभदायक ठरली नाही. मोदी-योगींच्या झंझावातापुढे सपा व काँग्रेसचा धुव्वा झाला. सन २०१७ मध्ये उत्तर प्रदेश विधानसभेच्या ४०३ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत काँग्रेसचे केवळ ७ आमदार निवडून आले, तर सपाचे ४७ आमदार विजयी झाले. सन २०२२ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे केवळ २ आमदार विजयी झाले. विशेष म्हणजे २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा केवळ एकच उमेदवार लोकसभेवर खासदार म्हणून निवडून आला, त्या म्हणजे सोनिया गांधी रायबरेलीतून विजयी झाल्या. काँग्रेसचे बाकीचे सारे उमेदवार पराभूत झाले. उत्तर प्रदेशात काँग्रेस पक्ष शोधावा लागतो, अशी परिस्थिती आहे. अशा वातावरणात राहुल गांधी आणि प्रियंका वाड्रा २०२४ मध्ये लोकसभा निवडणूक लढविण्याची हिम्मत दाखवतील का?

पुढील वर्षी होणारी लोकसभा निवडणूक सोनिया गांधी रायबरेलीतून लढवतील का?, हा सुद्धा कळीचा मुद्दा आहे. सोनिया, राहुल आणि प्रियंका तिघेही निवडणूक लढवणार असतील, तर भाजपला परिवारवादाचा मुद्दा अधिक प्रभावीपणे मांडण्याची आपसूकच संधी मिळेल. उत्तर प्रदेश काँग्रेस अध्यक्षांनी किंवा पक्ष कार्यकर्त्यांनी कितीही आळवणी केली तरी राहुल व प्रियंका या राज्यातून निवडणूक लढवायला तयार होतील का? हा यक्षप्रश्न आहे. २०१९ ची लोकसभा निवडणूक पराभूत झाल्यापासून राहुल यांनी अमेठीपासून फारकतच घेतली आहे. राहुल अमेठीकडे फिरकत नसल्याने त्यांचा जनसंपर्क राहिलेला नाही. याच अमेठीने राहुल गांधी यांना तीन वेळा खासदार म्हणून लोकसभेवर पाठवले पण त्यांनी मतदारांशी संपर्कच ठेवलाच नाही. त्यांची प्रतिमाही येथे कुणाला आकर्षित करेल, असे वातावरण नाही. आपल्या वडिलांची, आजीची पुण्याई हीच त्यांची पुंजी आहे, त्या जोरावरच ते निवडून येत होते. पण या पलीकडे त्यांनी या मतदारसंघाला काहीही दिले नाही. या उलट २०१९ मध्ये त्यांचा पराभव करून भाजपच्या स्मृती इराणी अमेठीतून खासदार झाल्या, केंद्रात मंत्रीही झाल्या. पण त्यांनी मतदारसंघाशी सतत संपर्क ठेवला आहे.

मतदारसंघात केंद्र व राज्याच्या अनेक विकास योजना राबवल्या जात आहेत. अमेठीवासीयांच्या सुख-दु:खात सहभागी होणारी लोकप्रतिनिधी अशी स्मृती इराणी यांची तेथे प्रतिमा आहे. **क्रमशः**

**- स्टेटलाइनः डॉ. सुकृत खांडेकर**

### शब्दकोडे-१६२



**आडवे शब्द**

१. निलाजरा ३. विषमच्या विरुद्ध ५. गवगवा ७. कापूस १०. बेचिराख होणे, राखरांगोळी १२. मल्ल १३. मृत्यू १५. अरण्य जाळणारा अग्नी १६. पिंटुकला डबा १७. भागीदार, वाटेकरी १९. डोक्यावर मारलेल्या थपडा २०. कुंतीचे पुत्र २२. पृथ्वी २३. मोठा हातोडा २४. रेशमाचे जाडसर कापड २६. समुद्र २८. चिंतन ३२. पूर्ण बदल ३३. प्रचंड आरडाओरडा ३४. पोपट ३६. पाचांमधील कनिष्ठा ३९. मिठाची चव ४०. संरक्षक भिंत ४२. गुजरातमधील सिंहांचे अभयारण्य ४३. मनातल्या मनात ४६. वाळवी ४८. वीज ४९. हिंदीत जास्त ५०. सत्व ५२. माझे ५३. वक्र ५५. अत्यंत श्रीमंत व्यक्ती ५८. गाण्याला चाल लावणारा ६०. खोकला ६२. मलई ६३. संत ---- सोनार ६४. नृत्यदेवता ६७. जिवलग मित्र ६९. लहान, छोटा ७२. अत्यंत तलम कापड ७३. नेस्तनाबूत, नाश ७५. विशेष ७६. भेद, तफावत ७७. उष्ण ७८. समीक्षक ७९. वर्तुळाकार

**उभे शब्द**

१. ढासळून पडणे २. जनावरांची गर्भावस्था ३. शर्यतीतील दोन प्राणी ४. होयबांना नसणारे ५. गीत ६. एकसारखे, सदोदित ७. चिवचिवाट ८. बासरी ९. कायदेशीर ११. अहल्याबाईंचे आडनाव १२. सैन्याचे पथक १४. शेतीचा हिवाळी हंगाम १५. मोठा भाऊ १८. त्या प्रमाणे २०. उपकार २१. वाघाची ललकारी २३. गर्द, निबीड २५. कापसाचे बी २७. पायापासून डोक्यापर्यंत २९. शहर ३०. हालचालीवर ठेवलेली नजर ३१. इंग्रजीत धनादेश ३५. लक्ष्मी नारायण ३७. अनेक रंगाचे ३८. आवश्यकता ३९. घराणे ४१. रोखलेली नजर ४४. मौज, गंमत ४५. च्या सह ४७. हिंदीत वेळ ५१. शाश्वत, कायम टिकणारे ५३. यात्रेला नियमित जाणारा ५४. दरोडा ५६. वस्ती ५७. हळदी-कुंकवाची डबी ५८. संध्याकाळ, सांजवेल ५९. अगदी थोडी जागा, दोन बोटाएवढे अंतर ६१. खळबळजनक ६५. साळ, आवरण ६६. लोककथा ६८. हिंदीत त्वाचा, चामडी ६९. लहान मूल ७०. तंबूची कापडी भिंत ७१. वाळा ७४. बंगाली चलन ७५. लोणच्यातील चटकदार रस

### शब्दकोडे १६१ चे उत्तर

**आडवे उत्तर -**

२.अस्त ३.राणा प्रताप सिंह ७.गर्व ८.अटकाव १०.तह ११.उडी १२.नीटनेटका १६.भाक १७.नभ १९.बटीक २०.पाककला २१.जरब २३.यकृत २४.माल २५.राणी २६.लगेच २८.सन ३०.गज ३२.रवी ३४.हिंदी महासागर ३८.मार्गदर्शक ४०.रांग ४१.सान ४२.नीर ४३.समता ४५.महाग ४६.वाणी ४७.मेथी ४९.सून ५०.नाट ५२.मेणा ५३.हय ५४.जलतरण ५६.शीर्ष ५७.तळ ५८.दहा ५९.हात ६०.टब ६१.वाट ६२.रदबदली ६४.लहान ६६.नार ६८.लग्न ६९.दाट ७०.धमनी ७१.नीज ७३.माया ७४.विकार ७६.कव ७९.मावशी ८२.रगड ८४.रसमलई ८७.आवड ८८.मुबलक ८९.फत्ते

**उभे**

१.सुटसुटीत २.अवनी ४.प्रथा ५.पतकर ६.सिंह ७.गडी ९.अनेक ११.उभयचर १३.टपाल १४.टकळी १५.काला १६.भाजणी १८.पितर २२.बल २४.मानहानी २५.राजमाता २७.अहिंसा २८.सन २९.दंग ३१.सदरा ३३.वीरांगना ३५.दीनवाणा ३६.सारमेय ३७.रस ३९.कमनशीब ४४.महाल ४८.परत ५१.टवटवी ५२.मेहरबानी ५३.हळद ५४.जहाल ५५.तहान ५७.तबला ६०.टर ६३.लीलया ६५.हानिकारक ६६.नाटक ६७.सामसूम ७२.जमाव ७३.माशी ७५.रग ७७.वर ७८.रई ८०.वड ८१.आब ८३.डफ ८५.सध्या ८६.लक्ष्य

## घर आणि परिसर स्वच्छ ठेवा

आपल्या महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक गावामध्ये नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने जनजागृती करीत असताना गावची स्वच्छता अतिशय महत्त्वाची असते. स्वच्छता असेल तरच आपण आरोग्यदायी जीवन जणू शकतो. यात कोकण पहिल्या स्थानी आहे, असे म्हणावे लागेल. कारण स्वच्छतेच्या बाबतीत देशपातळीवर कोकण विभागातील सिंधुदुर्ग जिल्ह्याचा गौरव करण्यात आलेला आहे. जिल्ह्यात शासकीय डॉक्टरांची कमतरता भासत असली तरी फार कमी लोक सर्दी, ताप आणि खोकल्याने आजारी पडतात. सन २०१६ पासून पावसाळ्यात नागरिक माकड तापाने आजारी पडत असत. त्यात दोघांचा मृत्यू झाला तरी आता माकड ताप नियंत्रणात आहे. हे केवळ स्वच्छतेमुळे शक्य झाले आहे.

ग्रामीण भागामध्ये आपला परिसर साफ करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी शाळकरी मुले करीत असतात. ही जमेची बाजू असली तरी प्रत्येक नागरिक आपली जशी काळजी घेतो तशी निसर्गाची सुद्धा काळजी घेणे गरजेचे आहे. म्हणजे आपले घर तसेच आपला परिसर स्वच्छ ठेवा असे म्हणावे लागणार नाही. यासाठी राज्यकर्त्यांनी जनतेच्या आरोग्याकडे सुद्धा थोडा वेळ काढून लक्ष द्यायला हवा. राज्यात नव्याने प्रकल्प राबवीत असताना त्याचे स्थानिक लोकांवर काय परिणाम होतील याचे स्पष्ट चित्र लोकांना सांगितले पाहिजे. त्याचे चांगले-वाईट परिणाम नागरिकांना सांगणे गरजेचे असते. तरच लोक त्या प्रकल्पाचे स्वागत करतील. केवळ शक्तिप्रदर्शन न करता कोणताही प्रकल्प स्थानिक नागरिकांना विश्वासात घेऊन सुरू केल्यास त्यांचेही मोलाचे सहकार्य राहील. याचा परिणाम अशा प्रकल्पामुळे आजूबाजूचा परिसर स्वच्छ राहील. त्यासाठी वेळच्या वेळी काळजी घेणे गरजेचे आहे. अशा वेळी घनकचरा विभागाची स्थापना करून दररोज स्वच्छता करून घ्यावी. तसेच घनकचऱ्याची योग्य त्या ठिकाणी विलेवाट लावावी. सुखा कचरा जाळून टाकावा.

ज्या ठिकाणी कचऱ्याची विलेवाट लावण्यात येणार त्या परिसरातील नागरिकांना त्याचा त्रास होणार नाही याची सुद्धा काळजी घ्यावी लागेल. अर्थात त्या परिसराची स्वच्छता अतिशय महत्त्वाची असते. तसेच वेळच्या वेळी जंतुनाशक फवारणी करावी. जेणेकरून टाकलेल्या कचऱ्याची दुर्गंधी येणार नाही याची काळजी घ्यावी. चारी बाजूने कुंपण असावे. त्याचप्रमाणे कुंपणाला लागून वस्ती असू नये. घनकचरा विभागात काम करणाऱ्या सेवकांची सुद्धा काळजी घ्यावी. त्यांची वेळच्या वेळी डॉक्टरी तपासणी करावी. त्यांना विशेष अतिरिक्त भत्ता देण्यात यावा. अशा क्षेत्रात काम करणारे बऱ्याच प्रमाणात वसनाच्या आहारी जातात. त्यात अनेक कुटुंबे कर्जबाजारी झालेली दिसून येतात. त्यात काहींनी आत्महत्या सुद्धा केलेल्या आहेत. त्यामुळे अशा सेवकांना किमान दोन महिन्यांतून व्यसनमुक्ती कार्यक्रम राबविण्यात यावा. जेणेकरून ते व्यसनाधीन होणार नाहीत याची काळजी घेतील. अशा सेवकांच्या वसाहती सुद्धा पान व स्टारच्या पिचकाऱ्यांनी रंगलेल्या असतात. तसे कॅम्प सुद्धा वसाहतीत राबवाव्यात. आता पावसाने थोडीफार विश्रांती घेतली तरी पावसाळा ऋतू संपण्यापूर्वी केवळ गावात नव्हे, तर राज्यात प्रत्येकांनी आपले स्वच्छ घर आणि स्वच्छ परिसर केला पाहिजे. **समाप्तः**

**- रवींद्र तांबे**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

**न्यूज कॉलम**

## बिबट्याच्या हल्ल्यात युवकाचा मृत्यू

**नाशिक ।** तालुक्यातील हरणगाव शिवारात जनावरे चारण्यासाठी जात असतांना उसाच्या शेतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने एका युवकावर हल्ला केल्याने त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, रविंद्र वामन गावित (३३) असे बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या युवकाचे नाव आहे. आज सकाळी ६ वाजेच्या सुमारास सदर तरुण जवळच्या जंगलात जनावरे चारण्यासाठी घेऊन जात असतांना लगतच्या उसात दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्याच्यावर हल्ला करत त्याला जखमी करून जंगलात ओढून नेले. त्यानंतर ग्रामस्थांनी त्याचा शोध घेतला असता दुपारच्या सुमारास रविंद्रचा मृतदेह विचित्र अवस्थेत आढळून आला. यावेळी बिबट्याने मयत रविंद्रचा खांदा, गळा आणि मांडी फाडल्याचे ग्रामस्थांच्या निर्दशनास आले.

# ‘आनंदाचा शिधा’ लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचवा

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहकसंरक्षण मंत्री छगन भुजबळ यांचे निर्देश

**औरंगाबाद । प्रतिनिधी**

गौरी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत आनंदाचा शिधा वितरणाचा निर्णय शासनाने घेतला आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत गणेशोत्सवाच्या आधी आनंदाचा शिधा लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवावा व त्यासाठी काटेकोर नियोजन करावे,असे निर्देश राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी काल येथे दिले.

मंत्री छगन भुजबळ हे औरंगाबाद येथे आले असता त्यांनी काल पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा आढावा घेतला. बैठकीस पुरवठा उपायुक्त गव्हाणे, जिल्हा पुरवठा अधिकारी वर्षाराणी भोसले, सहा. पुरवठा अधिकारी सोनाली जोंधळे, सहनियंत्रक वजनमापे सुरेश चाटे, उपनियंत्रक रमेश दराडे, सहायक नियंत्रक एस.वाय.मुंडे,



डी.व्ही गावडे आदी उपस्थित होते.

औरंगाबाद विभागात आठही जिल्हे मिळून गौरी गणपती उत्सवानिमित्त द्यावयाच्या आनंदाचा शिधा संदर्भात माहिती देण्यात आली. विभागात अन्न धान्य वितरणाची सरासरी आकडेवारी लक्षात घेता आनंदाचा शिधा साठी ३२ लाख ७६ हजार ३८७ शिधाजिन्नस संचाची मागणी नोंदविण्यात आली आहे, अशी माहिती देण्यात आली. विभागातील गोदामांच्या सद्यस्थितीबाबत, शिवभोजन देयकांच्या अदायगीबाबत आढावा घेण्यात आला.

भुजबळ म्हणाले की, गोदामांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन समितीकडून १० लाख रुपयांपर्यंतच्या दुरुस्ती कामासाठी निधी मिळावा, अशी तरतूद करण्यात येईल. शेतकऱ्यांच्या हितासाठी साखर कारखान्यांमध्ये उसाचे अचूक मोजमाप व्हावे यासाठी बनविण्यात आलेल्या प्रमाणित संचालन कार्यप्रणालीचे काटेकोरपणे पालन करन्याचे निर्देश यावेळी भुजबळ यांनी वैधमापन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. या प्रणालीनुसार साखर कारखान्यांमध्ये वापरात असणाऱ्या वे ब्रीजमध्ये डिजीटल लोड सेल बसविण्यात यावा व या हंगामापासून प्रमाणित संचालन कार्यप्रणालीची अंमलबजावणी करावी, असे निर्देश भुजबळ यांनी दिले. तसेच विभागातील प्रश्न आणि अडीअडचणींची माहितीही त्यांनी जाणून घेतली.

## युवा सेना उपजिल्हा प्रमुखपदी पवन दातीर

**सिडको । प्रतिनिधी**

युवा सेनेच्या उप जिल्हाप्रमुख पवन दातीर यांची नियुक्ती करण्यात आली असून या नियुक्ती बाबत शिवसेना उपनेते बबनराव घोलप, सुनील बागुल, जिल्हाप्रमुख विजय करंजकर,



महानगरप्रमुख सुधाकर बडगुजर, दत्ता गायकवाड, विनायक पांडे, युवा सेना जिल्हाप्रमुख दिपक दातीर यांनी त्यांच्या निवडीचे स्वागत केले आहे.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाने युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी नाशिक शहरातील युवासेना पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या आहेत. सदर नियुक्त्या तात्पुरत्या स्वरूपातील असून सहा महिन्यांनंतर पदाधिकाऱ्यांचे काम बघून कायम करण्यात येतील, असे युवासेना मध्यवर्ती कार्यालयातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

युवासेना नाशिक शहर - जिल्हा युवा अधिकारी - बाळकृष्ण शिरसाठ, उपजिल्हा युवा अधिकारी - गणेश बर्वे (मध्य विधानसभा), समर्थ मुठाळ (पूर्व विधानसभा), पवन दातीर (पश्चिम विधानसभा). जिल्हा चिटणीस - यश खैरे (मध्य विधानसभा), कल्पेश पिंगळे (पूर्व विधानसभा), सचिन निकम (पश्चिम विधानसभा), जिल्हा समन्वयक सतीश गीते (मध्य -- विधानसभा), सागर कोकणे (पूर्व विधानसभा), रामदास अहिरे (पश्चिम विधानसभा), महानगर युवा अधिकारी - ऋतुराज पांडे (मध्य विधानसभा), आकाश उगले (पूर्व विधानसभा), प्रवीण चव्हाण (पश्चिम विधानसभा) आदी.

# आरोग्य पतसंस्थेचे आर्थिक कामकाज कौतुकास्पद - डॉ.हर्षल नेहते

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा परिषद आरोग्य कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित नाशिक या संस्थेच्या ७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभा पतसंस्थेचे चेअरमन फैय्याज खान यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने निवृत्त आरोग्य कर्मचारी सन्मान सोहळा व सभासद पाल्य गुणगौरव सोहळा नाशिक जिल्हा परिषदेचे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हर्षल नेहते यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला.

याप्रसंगी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हर्षल नेहते यांनी आपल्या मनोगतात नमूद केले की, आपण उपस्थित पाल्य यांचे सुद्धा भविष्य चांगले घडावे हीच प्रत्येक पालकांची इच्छा असते. आरोग्य कर्मचारी पतसंस्था थोड्या अवधीतच ९३० च्या पुढे सभासद करुन स्वमालकीच्या इमारतीत कार्यरत होऊन नऊ कोटीच्या पुढे भागभांडवल झाले आहे ही मोठी अभिमानाची बाब असल्याचे




नमूद केले. आरोग्य कर्मचारी पतसंस्था सभासदांना नऊ लक्ष रुपये तात्काळ कर्ज व विमा सुरक्षा कवच योजना प्रभावीपणे राबवत आहेत ही अभिनंदनीय बाब आहे. करोना साथरोग काळात ग्रामीण भागातील जनतेस आरोग्य कर्मचारी व अधिकारी यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून, कुटुंबापासून एक-एक महिना दूर राहून खरे करोना योद्धा म्हणुन जनतेची सेवा केली त्याबद्दल आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

नाशिक जिल्हा परिषद आरोग्य कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस व्हॉईस चेअरमन जयवंत सुर्यवंशी, सचिव सुनिल जगताप, संचालक जी.पी.खैरनार, मधुकर आढाव, विजय देवरे, विजय सोपे, जयंत सोनवणे, प्रशांत रोकडे, संजय पगार, गोरक्षनाथ लोहकरे, श्रीकांत अहिरे, तुषार पगारे, सुलोचना भामरे, सोनाली तुसे, नाशिक जिल्हा सरकारी व परिषद बँकेचे चेअरमन बाळासाहेब ठाकरे, संचालक अमोल बागुल यांच्यासह जेष्ठ सभासद किशोर अहिरे, सचिन अत्रे, संपत शेळके, शोभा खैरनार, सारिका खैरे, संजय संवत्सरकर, अभिजित देशमुख, सुरज हरगोडे, अनिल राठी, सविता बागुल, कल्याणी देशमुख यांनी सभेतील चर्चेत भाग घेऊन आपला सहभाग नोंदविला.

## अपघातात एक ठार तर चार गंभीर जखमी

**नाशिक ।** देवगाव फाटा ते नैताळे रस्त्यावर रुई शिवारात शनिवारी दुपारी तीन वाजेच्या सुमारास पीकअप गाडी व मोटारसायकल यांच्यात झालेल्या अपघातात एक जण ठार झाला तर चार जण गंभीर झाले.जखमींमध्ये दोन लहान बालकांचा समावेश असून जखमींवर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहे.

या अपघातात मोटर सायकल वरील सोमनाथ वाळू पिंपळे वय ३८ मुळ रा.वळदगाव ता.येवला हल्ली रा.कतवारे वस्ती भरवस फाटा,सार्थक विष्णू पवार वय ५ रा.माळसाकोरे तालुका निफाड हल्ली रा देवगाव,गौरव बंडू पिठे वय ५ राहणार ओतूर ता.कळवण,वाळ्याबाई बंडू पिठे वय ३० रा.ओतूर ता.कळवण हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना रुग्णालय निफाड जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले असता उपचारा दरम्यान सोमनाथ वाळू पिंपळे हा मयत झाला असून इतर जण गंभीर जखमी आहे.

# स्वावलंबी भारत अभियानाची नव उद्योजकांसाठी आजपासून उद्योजकता विकास यात्रा

**नाशिक । प्रतिनिधी**

महाविद्यालयीन युवकांना उद्योजकतेची माहिती व्हावी आणि स्वरोजगार विषयक शासकीय योजना कळाव्यात याकरिता आज २८ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर दरम्यान स्वावलंबी भारत अभियान नाशिक व अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांच्या वतीने जिल्हास्तरीय उद्योजकता विकास यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती अभियानाचे जिल्हा समन्वयक व यात्रा प्रमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

उद्योजकता विकास यात्रेची सुरुवात आज सोमवारी सकाळी ९:३० वाजता प्रवरा कॉलेज कॅम्पस सिन्नर या ठिकाणी होणार आहे. उद्योजकता विकास यात्रेचा उद्घाटन कार्यक्रम सर विश्वसरह्या इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी सिन्नर महाविद्यालयात होणार असून. यानंतर उद्योजकता विकासरथ नाशिक जिल्ह्यातील १४ तालुक्यांतील ४५ महाविद्यालय परिसर, १२४ महाविद्यालय, २ महानगर पालिका क्षेत्र ७४ गावांमधील अभियांत्रिकी महाविद्यालय, कृषी महाविद्यालय, औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, एमआयडीसी, ग्रामीण भाग, शहरी भाग मध्ये जाऊन व्याख्यान, चित्रफित, पत्रके आदींच्या माध्यमातून युवकांना उद्योजकतेविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

अनेक युवकांना व्यवसाय, उद्योग करण्याची इच्छा असते. परंतु योग्य मार्गदर्शन न मिळाल्यामुळे त्यांना व्यवसाय करणे शक्य होत नाही. त्यामुळे स्वावलंबी भारत अभियान नाशिकतर्फे हा उपक्रम घेण्यात येत आहे. व्यवसाय कोणता व कसा निवडावा, व्यवसाय सुरू करण्यासाठीची पूर्वतयारी, शासकीय कार्यालयांमध्ये तसेच बँकांमध्ये कागदपत्रांची पूर्तता कशी करावी आदी मार्गदर्शन यावेळी करण्यात येणार आहे. या उद्योजकता विकास यात्रेमध्ये विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद, भारतीय विश्वविद्यालय संघ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ या शैक्षणिक संस्था देखील सहभागी आहेत. पत्रकार परिषदेस स्वावलंबी भारत अभियानाचे जिल्हा समन्वयक योगेश शिंदे, अभाविपचे महानगर मंत्री ओम मालुंजकर, यात्रा प्रमुख व्यंकटेश अवसरकर आदी उपस्थित होते.

# लासलगाव महाविद्यालयात विद्यार्थ्यांना अँटी रॅगिंग संदर्भात मार्गदर्शन

**नाशिक। वार्ताहर**

लासलगाव येथील नूतन विद्या प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये निफाड तालुका विधी सेवा समिती,वकील संघ आणि विद्यार्थी विकास मंडळ, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लासलगाव यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित विधी साक्षरता शिबीर प्रसंगी विद्यार्थ्यांना रॅगिंग संदर्भात असलेल्या कायदेशीर बाबी, वाहतुकीचे नियम, विद्यार्थ्यांनी विद्यार्थी जीवनामध्ये कोणत्या नियमांचे पालन केले पाहिजे याविषयी सविस्तर असे मार्गदर्शन निफाड तालुका विधी सेवा समिती आणि वकील संघाच्या वतीने करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निफाड वकील संघाचे अध्यक्ष




ड.प्रवीण नामदेवराव ठाकरे होते. निफाड वकील संघाचे सचिव ड.आर.बी.शिंदे यांनी अध्यक्षीय सूचना केली त्यास निफाड वकील संघाच्या सदस्या ड.वैशाली मोरे यांनी अनुमोदन दिले तसेच याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक न्यायाधीश बी.डी.पवार (अतिरिक्त सत्र न्यायाधीश, निफाड) यांनी विद्यार्थ्यांना 'निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट क्ट व बँकिंग विषयक कायदे' याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले तसेच मुंबई मंत्रालयातील विधी व न्याय विभागाचे सहसचिव विलास वसंतराव गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना 'रॅगिंग प्रतिबंधक कायदा' याविषयी मार्गदर्शन केले तर नासिक जिल्हा वकील फेडरेशनचे अध्यक्ष ड.इंद्रभान रायते यांनी 'महिलांविषयी कायदे' या विषयावर मार्गदर्शन केले आणि निफाडचे वरिष्ठ स्तर सहदिवाणी न्यायाधीश श्रीमती ए.एल.सराफ यांनी 'बालविवाह प्रतिबंधक कायदा' याविषयी मार्गदर्शन केले तर जेष्ठ विधीज्ञ ड.मधुकर व्यवहारे यांनी 'बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा आणि पोक्सो क्ट' या विषयी मार्गदर्शन केले तर अॅड.समीक्षा पाटील यांनी विद्यार्थ्यांना 'सायबर सिक्युरिटी' या विषयावर मार्गदर्शन केले.

## रुग्णवाहिका चालकांचा १ सप्टेंबरपासून पासून संप

**नाशिक ।** राज्यात आपत्कालीन मोफत वैद्यकीय आरोग्यसेवेसाठी १०८ क्रमांकावर संपर्क साधून रुग्णवाहिका मिळण्याची सुविधा २०१४ पासून सुरू करण्यात आली आहे. त्यावरील चालक गेल्या ९ वर्षांपासून अत्यंत कमी पगारावर काम करत आहेत. वेतन वाढवून मिळत नसल्यामुळे त्यावर त्वरित तोडगा काढावा या मागणीसाठी महाराष्ट्र रुग्णवाहिका क्रमांक १०८ वाहनचालक संघटनेने १ सप्टेंबर २०२३ पासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा दिला आहे. त्यात राज्यातील १९८०, तर नाशिकमधील १२० चालक सहभागी होणार असल्यामुळे रुग्णसेवा व आरोग्यसेवा ठप्प होण्याची चिन्हे आहेत. चालक संघटनेने दिलेल्या निवेदनामध्ये, बीव्हीजी कंपनीकडून वाहनचालकांना अत्यंत कमी पगार देत शोषण सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# गरजू व निराधार महिलांना धान्याचे कीट व साड्या वाटप

**शिरपूर । वार्ताहर**

एस. व्ही. के.एम. मुंबई संस्थेचे सह-अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला गुरुवारी शहरातील वरवाडे येथील महात्मा फुले चौकात धान्यतुला करण्यात आली. धान्याचे कीट व साडया परिसरातील गरजू, निराधार महिलांना वितरित करण्यात आल्या.

कार्यक्रम प्रसंगी भूपेशभाई पटेल यांना देवदूत का म्हटले जाते याचे स्पष्टीकरणसह संबंधितांनी स्वतःच्या शब्दात भूपेशभाई पटेल यांनी कशी मदत केली याविषयी महेंद्र माळी यांनी कथन केल्याने ते ऐकतांना सर्वांच्या डोळ्यात अश्रू आले.

त्यानंतर केक कापून वाढदिवस साजरा करत भूपेशभाई पटेल यांची धान्यतुला करण्यात आली. धान्य, डाळी, तेल यांचा समावेश असलेले कीट व साड्यांचे वाटप परिसरातील गरजू निराधार महिलांना करण्यात आले. यावेळी माजी उपनगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, सौ. कृतीबेन भूपेशभाई पटेल, सुकन्या सौ. दिशा दीदी देसाई,



कु. द्वेतादीदी भूपेशभाई पटेल, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, माजी नगराध्यक्ष प्रभाकरराव चव्हाण, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, कैलासचंद्र अग्रवाल, विवेक वैद्य, सौ. सीमा वैद्य, कक्कूबेन पटेल, माजी नगराध्यक्ष संगीता देवरे, अखिल भारतीय समता परिषदेचे तालुकाध्यक्ष पिंटू माळी, माजी उपनगराध्यक्ष वासुदेव देवरे, बाजार समितीचे सभापती के. डी. पाटील, मर्चंट बँकेचे अध्यक्ष प्रसन्न जैन, भटू माळी, बोराडीचे उपसरपंच राहुल रंधे, माजी नगरसेवक हर्षल राजपूत, पिंटू शिरसाठ, श्यामकांत ईशी, नितीन गिरासे, संतोष माळी, चंदू पाटील, धीरज देशमुख, विविध संस्थांचे पदाधिकारी, विविध मित्र मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, पदाधिकारी, वरवाडे ग्रामस्थ आदी उपस्थित होते. विजय बागुल व महेंद्र माळी यांनी सूत्रसंचलन केले. समता परिषदेचे तालुका पिंटू माळी यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी संत सावता माळी समाज मंदीर ट्रस्ट वरवाडे, महात्मा फुले युवा मंच, संत सावता मित्र मंडळ, संत सावता भजनी मंडळ यांनी सहकार्य केले.

# प्रत्येक व्यक्तीत देव आहे : जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज यांचे प्रतिपादन

**नाशिक । प्रतिनिधी**

प्रपंच त्यागून चालणार नाही. योग्य प्रकारे विचार करा, हा देह नीट प्रपंच करण्यासाठीच आहे. तुम्ही सर्वजण सर्वजण उत्तम पुरुष होऊ शकतात. कर्तुत्वाने उत्तम होता येते मग तो पुरुष असो की स्त्री. कृतीतून दाखवा की आपणच देव आहोत. मद, मोह, मत्सर, माया यांचे आवरण शरीरावर असल्याने तुमच्यातील देवत्व झाकले गेले आहे. सद्गुरूंच्या वाणीत, सहवासात सामर्थ्य आहे. योग्य सद्गुरु सापडले की देव होता येते. प्रत्येक व्यक्तीत देव आहे असे प्रतिपादन अनंत विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांनी भक्तांना मार्गदर्शन करताना केले.

जनम संस्थानाच्या वतीने असे आशेवाडी येथील उत्तर महाराष्ट्र उपपीठात





प्रवचन, दर्शन व समस्या मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हजारो भक्तांनी येथे दर्शनासाठी गर्दी केली होती. यावेळी दर्शनासाठी भक्तांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. जगद्गुरु श्री पुढे म्हणाले की, जन्म प्रपंच करण्यासाठीच घेतला आहे. प्रपंच नीट करता आला नाही तर पुन्हा मानव जन्म घ्यावा लागेल. ज्या चांगल्या गोष्टी या जन्मात टाळल्या, त्या पूर्ण करण्यासाठी पुन्हा मनुष्य जन्म घ्यावा लागतो. मन गुरूंच्या चरणी अर्पण केल्यास या जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्तता मिळते. श्री स्वरूप सांप्रदायाच्या माध्यमातून रोज अध्यात्मिक शाळा घेतली जाते. यामुळे अध्यात्मिक क्रांती पहावयास मिळत आहे. संसारात आहोत. पण संसारात अडकलेले नाही असे भाव भक्तांमध्ये यामुळे निर्माण झाले आहे. संसारात सुखदुःख येणारच, पण जीवनात सात्विकता वाढवा. यामुळे मोक्ष मिळेल. भगवे कपडे घातले म्हणजे वैराग्य नव्हे, मनाने वैराग्य स्वीकारले पाहिजे. त्यामुळे मद, मोह, माया यापासून दूर जाता येते. कुणाचं वाईट करण्याचा प्रयत्न करू नका. सद्गुरु सांगतील ते करा. यामुळे वेगळा परमार्थ करण्याची गरज नाही. दिवसातून दहा मिनिटे वेळ काढून भक्ती करा. त्यामुळे जे प्राक्तनात आहे ते मिळवता येते. श्री जगद्गुरु श्री पुढे म्हणाले की, भक्त एकनिष्ठ असावा. निष्पाप भाव भक्तीत गरजेचा आहे. असा भाव देवाला आवडतो.

महामार्गावर अपघाताचे प्रमाण वाढले आहे. अपघातग्रस्तांचे प्राण वाचवण्यासाठी संस्थानच्या वतीने दर पन्नास किलोमीटर अंतरावर एक अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी रुग्णवाहिका सेवा सुरू आहे. गेल्या दोन महिन्यांपूर्वी नवीन पाच रुग्णवाहिका सुरू करण्यात आल्या. आता बेचाळीस रुग्णवाहिका सेवा देत आहेत. नव्याने आठ रुग्णवाहिका संस्थानाच्या वतीने सुरू करणार आहेत. यामुळे नव्या महामार्गावर देखील रुग्णवाहिका सेवा सुरू करता येणार आहे.

# आज नाशिप्रतर्फे यार्दी व्याख्यानमाला नाशिकरोडला

## ‘सावधान! धोका कुटुंबापर्यंत आला आहे’

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ, नाशिक या संस्थेचे संस्थापक सदस्य कै. रं. कृ. यार्दी व्याख्यानमाला मध्ये

आज सोमवार दि. २८ रोजी दुपारी ३ वाजता पुरुषोत्तम इंग्लिश स्कूलचे धामणकर सभागृह येथे विद्यावाचस्पती विवेक घळसासी यांचे 'सावधान! धोका कुटुंबापर्यंत आला आहे' या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. अशी माहिती सेक्रेटरी अश्विनीकुमार येवला यांनी दिली.

पालकांनी पाल्यांकडे कशाप्रकारे लक्ष दिले पाहीजे, यासाठी समाजात जनजागृती व्हावी या उद्देशाने या व्याख्यानाचे आयोजन केले आहे. नाशिकरोड संकुलातील शाळा व महाविद्यालयमधील पालकांसाठी आयोजित केले आहे. पालकांनी व्याख्यानास उपस्थित रहावे असे आवाहन संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ.राजेंद्र कलाल,

सेक्रेटरी अश्विनीकुमार येवला, प्राचार्य संजय चव्हाण, प्राचार्य समिर लिंबारे, मुख्यध्यापिका सुचिता कुकडे यांनी केले आहे.

## न्यूज कॉलम

### धनदाईनगर येथे म्युझिकल एक्सरसाइज योगा

**धुळे।** मानव रुहाणी केंद्र दहिवद तर्फे बभळाज गावात २५७ रुग्णांची २७ ऑगस्ट २०२३ रविवारी रोजी मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबिरात एकूण २५७ रुग्णांची तपासणी करून त्यांना डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मोफत औषधी देण्यात आली. या प्रसंगी सरपंच जगन्नाथ काशिराम महाजन, उपसरपंच काशिनाथ हिलाल हटकर, ग्रामसेवक व्ही. एस. पाटील, पंडित लालसिंग राजपूत, दादूसिंग सरदारसिंग राजपूत, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या समाज सेवेच्या कार्या बद्दल कौतुक करण्यात आले. या कामी डॉ. लखन रामकृष्ण महाजन, डॉ. भालचंद्र पंडित बडगुजर, डॉ. कु. पूजा अशोक शिरसाळे यांनी आरोग्य निदान केले.

### पाच कंदील परिसरात विक्रेत्यांचे अतिक्रमण

**धुळे।** शहरातील पाचकंदील परिसरात मुख्य बाजारपेठ आहे. मात्र या बाजारपेठेत रस्त्याच्या दुतर्फा किरकोळ विक्रेते हातगाड्या उभ्या करीत असल्याने, वाहतुकीला अडथळा होतो. त्यामुळे या भागात पायी चालणेही कठीण होत असते. या विक्रेत्यांना इतरत्र जागा देण्यात यावी अशी मागणी होऊ लागली आहे.


# ‘कवय पाऊस यी : कपाशी कईन वाढी; कयीन येचसूत..

**दुष्काळाचे संकेत मिळत असल्याने शेतकरी हवालदिल**

**धुळे । प्रतिनिधी**

जिल्ह्यात पंचवीस दिवसांपासून पाऊस नाही. जेमतेम महिनाभराची पिके झाली अन् पावसाने ओढ दिली आहे. आता दोन महिन्यांपासून पाऊस नसल्याने पिके ऊन धरू लागली आहेत. कोरडवाहू जमिनीतील पिकांची नाजूक अवस्था झाली आहे. पावसाळ्याला महिना उरला आहे. उत्तरार्धात पावसाचा पिकांना काडीचा फायदा होणार नाही. कपाशीचे पीक जेमतेम अर्धा फूट वाढले आहे.‘कवय पाऊस यी. कोणता खुगले कपाशी मोठी व्हयी नि आयी कपाशी येचसूत,’ अशी चिंता शेतकरी व शेतमजूर व्यक्त करू लागले आहेत. भयाण दुष्काळाचे संकेत मिळत असल्याने शेतकरी हवालदिल आहेत.

महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करा अशी मागणी सध्या जोर धरु लागलेली असतानाच धुळे जिल्ह्यात दुष्काळाचे एक भीषण वास्तव समोर आले आहे. पावसाने पाठ फिरवल्याने पिण्याच्या पाण्याची अडचण निर्माण झाली आहे, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे, कांदा उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे तर ऑगस्ट महिन्याच्या शेवटी टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो आहे. एवढंच काय तर गावातल्या मुलामुलींची लग्नही लांबल्याचं शेतकरी सांगत आहेत. जिल्ह्यातील अनेक भाग हा पावसाळ्यात कोरडाठाक पडत चालला आहे. अनेक गावं सध्या तहानलेली असून पावसाने पाठ फिरवल्याने भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. जिल्ह्यातील बहुतांश भागात पाऊस नसल्याने दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे.


### देवाला साकडे घालून पाऊस पडे ना

पाऊस पडावा म्हणून ग्रामीण भागात विविध पारंपरिक पद्धतीने उजाळा दिला जात आहे. देवाचा धावा केला जातोय.

### विहिरीही आटू लागल्या

नदी-नाले वाहिलेले नाहीत. लहान-मोठे सारेच बंधारे कोरडे झाले आहेत. तलाव व धरणांत मृत साठा आहे. विहिरी व कूपनलिकांची पातळी खोलवर गेली आहे. विहिरींचा उपसा होत आहे. बागायती पिके वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची तारेवरची कसरत सुरू झाली आहे.

### शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ

मृग नक्षत्रात पाऊस झाला नाही. जून महिना कोरडा गेला. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यांपर्यंत पेरण्या झाल्या. आता जवळपास महिनाभरापासून पाऊस नाही. ज्वारी, बाजरी, मका, कपाशी, सोयाबीन आदी सारीच पिके ऊन धरू लागली आहेत. हलक्या जमिनीत पिके पाण्याअभावी अन् उन्हामुळे करपू लागली आहेत. भयाण दुष्काळाची चाहूल लागत असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. या वर्षी देवाने ताटात दुष्काळ वाढून ठेवल्याची जाणीव होत असल्याने चिंता वाढली आहे.

ऑगस्ट महिन्याचे दोन ते तीन दिवस शिल्लक असून समाधानकारक पाऊस न झाल्याने चक्क पिकांना तांब्या-तांब्याने पाणी देण्याची वेळ आली आहे.

जिल्ह्यात पंधरा दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने पिकांनी माना टाकून दिल्या आहेत. त्यांची वाढ पूर्णपणे खुंटली आहे. त्यामुळे खरीप हंगामावर अरिष्ट आल्याने शेतकरीराजा हवालदिल झाला आहे.

जूनमध्ये वेळेवर पडलेल्या पावसाच्या भरवशावर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या. मात्र आता दोन आठवड्यांपासून पावसाने दडी मारल्याने जिल्ह्यातील खरीप हंगाम धोक्यात आला आहे.

# म्हाडाच्या भुई भाडे वाढीबाबत लवकरच निर्णय घेणार- ना.सावे



### आ. सीमा हिरे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाला दिले आश्वासन

**नाशिक । प्रतिनिधी**

म्हाडाच्या घरांवर आकारण्यात आलेल्या भूई-भाडे वाढीबाबत लवकरच म्हाडाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन समाधानकारक निर्णय घेतला जाईल. तोपर्यंत कोणाचीही अडवणूक केली जाणार नाही.असे आश्वासन गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी दिल्याने नागरिकांना तूर्त दिलासा मिळाला आहे.

सातपूर परिसरात विविध उत्पन्न गटातील म्हाडाची जवळपास तीन हजार घरे आहेत. गेल्या ३० ते ४० वर्षांपासून म्हाडा भुईभाडे वसूल करीत आहे. पूर्वी २०० ते ५०० रुपये असणारे भुई भाडे जुलै महिन्यापासून अचानक दहा हजार ते पंधरा हजारापर्यंत वाढ करण्यात आली आहे.१०० पटीपेक्षा अधिक अन्यायकारक वाढ करण्यात आली आहे. तसेच पुढील ३० वर्षांचे भूईभाडे म्हणून जवळपास साडे चार लाख रुपयांची वसुली करण्यात येणार आहे. ही अन्यायकारक भुईभाडे वाढ पूर्णपणे रद्द करण्यात यावी यासाठी म्हाडाचे मुख्याधिकारी त्र्यंबक कासार यांना निवेदन देण्यात आले आहे.

दरम्यान म्हाडाच्या घरांवर आकारण्यात आलेली अन्यायकारक भूई-भाडे वाढ रद्द करण्यात यावी. या मागणीसाठी आ. सीमा हिरे यांच्या नेतृत्वाखाली सातपूर कॉलनीतील श्री सप्तशृंगी जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष किसनराव खताळे, सचिव प्रकाश महाजन, समतानगर हौसिंग सोसायटीचे नितीन विसपुते तसेच संजय राऊत, गौरव बोडके, रामहरी संभेराव, भगवान काकड आदिंसह नागरिकांनी गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांची मंत्रालयात जाऊन भेट घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी दरवाढ रद्द करण्याच्या मागणीचे निवेदन देण्यात आले. यावेळी नगररचना विभागाच्या प्रतिभा भदाणे, म्हाडाचे मुख्यकार्यकारी अधिकारी जयस्वाल, उपसचिव कवडे, अवर सचिव केंद्रे, अप्पर मुख्य सचिव गृह निर्माण वलसा नायर, नाशिक मनपा आयुक्त करंजकर, म्हाडा मुख्याधिकारी त्र्यंबक कासार आदी उपस्थित होते.

# धुळे जिल्ह्यातील शेतकर्यांना विमा कंपनीने २५% अग्रीम रक्कम द्यावी-आ.कुणाल पाटील

**धुळे । प्रतिनिधी**



धुळे जिल्हयात सलग २५ दिवसापेक्षा अधिक पाऊसच झाला नसल्याने शेतकर्यांची पिके करपू लागली आहे.जिल्हयात दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकर्यांनी पिक विमा काढला असून धुळे जिल्हयात मध्य हंगामातील प्रतिकूलता जाहिर करुन शेतकर्यांना २५ टक्के अग्रीम रक्कम विमा कंपनीने तत्काळ नुकसान भरपाई म्हणून द्यावी अशी मागणी आ.कुणाल पाटील पाटील यांनी मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे कि, पाऊस नसल्याने धुळे जिल्हयात दुष्काळाची भीषणता जाणवू लागली आहे. सुरुवातीपासूनच सरासरीपेक्षा कमी पाऊस असल्याने कोरडा दुष्काळाचे चित्र स्पष्ट झाले आहे. कर्जाने पैसे घेवून शेतकर्यांनी मशागत केली,पेरणी केली काही ठिकाणी पिके जेमतेम जमीनीबाहेर आले मात्र पाऊस नसल्याने पिकांची वाढ खुंटली तर तीच पिके करपू लागली आहेत.जिल्हयात गेल्या २५ दिवसापासून पावसाने खंड दिला आहे. पाऊसच नसल्याने कपाशी, बाजरी, ज्वारी, भूईमुग, तूर, उडीद, मूग, कांदा यांच्यासह खरीपातील विविध पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.अर्थातच खरीप हंगाम हातचा गेला आहे. शासनाच्या आवाहनानुसार शेतकर्यांनी खरीप पिकांचा विमा काढलेला आहे. दुष्काळीसदृश्य परिस्थीती आणि मध्य हंगामातील प्रतिकूलता जाहिर करुन शासनाने विमा कंपनीला शेतकर्यांना २५ टक्के अग्रीम रक्कम तत्काळ देण्याबाबत सूचना करावी अशी मागणी आ.कुणाल पाटील यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषीमंत्री तसेच धुळे जिल्हाधिकारी,जिल्हा कृषी अधिक्षकांकडे केली आहे. अग्रीम रक्कम दिल्यास शेतकर्यांना दिलासा मिळाणार असल्याचे आ.पाटील यांनी सांगितले आहे.

# श्री हंस कल्याणधाम आश्रमात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

**नाशिक । प्रतिनिधी**

देशभक्तीपर गीतांचे गायन, त्यावर सादर होणारी नृत्य, विविध कलाकृतींमधून योगसाधनेपासून शौर्यगाथांपर्यंतचा उलगडत गेलेला पट अशा मंत्रमुग्ध करणाऱ्या वातावरणात नाशिक-पुणे रोडवरील श्री हंस कल्याण धाम आश्रमात मंगळवारी स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी पहिली ते पदवीपर्यंतच्या परीक्षांमध्ये ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यात आली.

सदगुरूदेव श्री सतपालजी महाराज प्रणीत मानव उत्थान सेवा समितीच्या श्री हंस कल्याण धाम आश्रमात स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. आश्रमाच्या प्रबंधक साध्वी हिराजी यांच्या हस्ते सकाळी ध्वजारोहण झाले. साध्वी पंकजाजी, साध्वी मिथिलेशजी, महात्मा अनासक्तानंदजी यांसह मानव सेवा दलच्या जवानांनी ध्वजाला वंदन केले. त्यानंतर मध्यप्रदेशातून आलेल्या श्री हंस भजनी मंडळाने भक्तीगीते सादर केली. उपस्थित चिमुकल्यांनी देशभक्तीपर गीते, स्वातंत्र्यासाठी योगदान देणाऱ्यांच्या शौर्यकथा सांगितल्या. देशभक्तीपर गीतांवर नृत्येही सादर झाली. त्यास उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली. इयत्ता पहिली ते पदवीपर्यंतच्या परीक्षांमध्ये ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले.

# एअर कंडिशनिंगचे फार्मा उद्योगात अनन्यसाधारण महत्व

### इशरे चर्चासत्रातील सूर

**नाशिक । प्रतिनिधी**



विविध औषधे निर्माण करून लाखोंचे प्राण वाचविणाऱ्या फार्मा उद्योगामध्येही औषधे तयार होतांना योग्य तापमान व हवामानाची जबाबदारी ही एअर कंडिशनिंग व व्हेन्टीलेशन पुरविणाऱ्या व्यावसायिकाची असून या व्यावसायिकांनी तापमानातील बदल तसेच आधुनिक व पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाची कास धरावी. असे आवाहन ग्लॅक्सोस्मितलाइन फार्माचे उत्पादन प्रमुख कन्हैया मेहरोत्रा यांनी केले.ते इशरे (इंडियन सोसायटी फॉर हिटिंग,रेफ्रीजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स) तर्फे आयोजित’फार्मा कनेक्ट’या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

या कार्यशाळेत १०० हून अधिक औषध उत्पादन प्रतिनिधी सहभागी झाले होते. याप्रसंगी इशरे नाशिक चॅप्टरचे अध्यक्ष गोविंद नायर, कार्यशाळेचे समन्वयक सारंग दिडमिशे, प्रविण पातुरकर, सचिव वरूण तिवारी व अमर ग्रोव्हर हे मान्यवर उपस्थित होते. कन्हैया मेहरोत्रा पुढे म्हणाले कि, आगामी काळात आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंगमुळे एअर कंडिशनिंग क्षेत्रात आमुलाग्रह बदल होणार असून इंडस्ट्री रीवोल्यूशन ४.० फार्मा हा फार्मा उद्योगातील महत्वपूर्ण टप्पा आहे. या चर्चासत्रात तज्ञ म्हणून संदीप शाह, संत अडवाणी व युसुफ बटासिवाला यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाम कापसे, ए. ए. कागदी तसेच सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शृंगेरी जगद्गुरूंच्या जन्मोत्सवानिमित्त पंचवटीत विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न

**नाशिक । प्रतिनिधी**




पंचवटीतील शृंगेरी शंकराचार्य मठामध्ये विद्यमान जगद्गुरु शंकराचार्य श्री श्री भारती तीर्थ महास्वामीजी यांच्या आशीर्वादाने पीठाधीश्वर झालेले जगद्गुरु शंकराचार्य श्री श्री विधुशेखर भारती महास्वामीजी यांचा ३१ वा वर्धापन दिन धार्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ विधिज्ञ एस. एल. देशपांडे, श्रीकृष्णकुमार राव प्रमुख यजमान होते. यानिमित्ताने विश्व कल्याणार्थ रविवार व सोमवार रोजी गणपती पूजन, गुरु पादुका पूजन, महाअभिषेक, एकादशनी रुद्राभिषेक, दशांश होम, महाप्रसाद आदी कार्यक्रम उत्साहात झाले. काल दि. २१ रोजी सकाळी गणपती होमाने प्रारंभ झाला. कार्यक्रमास महर्षी गौतम गोदावरी वेदविद्या प्रतिष्ठानचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

वेदाचार्य रवींद्र पैठणे गुरुजी, वेदाचार्य दिनेश गायधनी गुरुजी यांनी पौरोहित्य केले. नाशिककर भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. शृंगेरी मठाचे व्यवस्थापक श्रीराम अय्यर, बलराम, कमला, राजश्री अय्यर, वेंकटरमणी व सहकाऱ्यांनी स्वागत केले आणि कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# दोन दुचाकींची धडक, एकजण जखमी

**धुळे।** तालुक्यातील सोनगीर येथे मुंबई- आग्रा महामार्गावर दोन दुचाकींची धडक झाली. यात विनोद महादू भामरे (वय ३६, रा. दापुरी ता.धुळे) हा जखमी झाला. याप्रकरणी विनोद भामरे याने दिलेल्या फिर्यादीवरून सोनगीर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्या मानधनात वाढ

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत येणाऱ्या अंगणवाडीत मुख्य सेविका, अंगणवाडी सेविका व मदतनीस तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर कार्यरत आहेत. त्यांच्या मानधनात वाढ करण्यास नाशिक मनपा आयुक्त तथा प्रशासक अशोक करंजकर यांनी मान्यता दिली आहे.

अंगणवाडी मुख्य सेविका, अंगणवाडी सेविका यांच्या मानधनात प्रतिमहा प्रत्येकी रुपये २००० व अंगणवाडी मदतनीस यांच्या मानधनात प्रतिमहा प्रत्येकी रुपये १६०० वाढ करण्यात आली आहे. यामुळे



मुख्य सेविका यांचे सुधारित मानधन रुपये ८५००अंगणवाडी सेविका यांचे दरमहा रुपये ७६२० व अंगणवाडी मदतनीस यांचे दरमहा रुपये ७००/ एवढे सुधारित मानधन झाले आहे.

शहरातील अंगणवाड्यात ५ मुख्य सेविका, ३०५ अंगणवाडी सेविका व ३०२ मदतनीस कार्यरत आहेत. अशी माहिती समाज कल्याण विभागाचे उपायुक्त प्रशांत पाटील उपायुक्त यांनी दिली आहे.

# नाशिकच्या कार्तिक स्वामी संस्थेकडून शैक्षणिक साहित्याचे वाटप

**सामोडे । प्रतिनिधी**

कार्तिक स्वामी आदिवासी बहुउद्देशीय मंडळ नाशिक यांच्यातर्फे साक्री तालुक्यातील दुर्गम भागातील सुतारे जि.प.शाळेच्या ७० विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष डी.पी.जाधव होते. प्रमुख अतिथी म्हणून नमंडळाचे उपाध्यक्ष डी.एल. जोपळे, बहीरम,खजिनदार डी.पी. भरसट, सरचिटणीस एस.जी. पवार,से.नि.प्राचार्य एस.डी. पाटील,सरपंचा लक्ष्मीबाई चौरे, ग्रामस्थ ग्राम सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रथम भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचेपूजन मान्यवरांच्या हस्ते झाले. यावेळी चौथीच्या विद्यार्थिनींनी अतिशय




सुंदर स्वागत गीत सादर केले.

यावेळी बोलताना डी.पी.जाधव म्हणाले उद्याचे उज्वल भविष्य असलेली आमची मुलं,प्राथमिक शिक्षण घेत असताना आर्थिक परिस्थिती अभावी आदिवासी पालक मुलांना शिक्षण देवू शकत नाही. त्यांच्या पाल्याना मंडळाच्या वतीने दरवर्षी मोफत साहित्याचे वाटप सलग १२ वर्षापासून निस्वार्थ भावनेने करीत आहोत, समाजावर कुठलेही उपकाराच्या भावनेने आम्हीहे काम करीत नाही. समाजातला वंचित दुर्लक्षित घटक शिक्षणाच्या प्रवाहात यावा यासाठी शैक्षणिक साहित्य बरोबरच विद्यार्थी व पालकांचे प्रबोधन करून मुलांना नेहमी शाळेत पाठवा, त्याचा प्रगतीचा आलेख विचारा, शिक्षकांची भेट घ्या.मंडळ या व्यतिरिक्त आत्तापर्यंत समाजातील गुणवंतांचा सन्मानाचे तीन कार्यक्रम दोन नाशिक येथे एक पिंपळनेर येथे अशा तीन कार्यक्रमा म्हणजे २६५ समाज बांधवांचा सन्मान करण्यात आला. वधू-वर परिचय १८ मेळावे झाले. ४२००विवाह जमवुन ४००० कुटुबाशी जोडले गेलो. आतापर्यंत त्यासाठी नाममात्र फी फक्त पाचशे रुपये घेतो. विवाहपूर्व नोंदणी कार्यक्रम,वधु वर सुचक कार्यक्रम त्यात ५ घटस्फोटिताचे विवाह संपन्न झाले आहेत. पहिली दुसरीच्या विद्यार्थ्यांना पाटी पेन्सिल, वह्या, पेन ,कंपास फुटपट्टी ,पॅड ,खोडरबर, शॉपनर,दुरेघी एकरी वह्या, तिसरी चौथीच्या मुलांनाही वरील सर्व वस्तूंबरोबरच चार रेघी वह्या लाँग बुक, वाटप करण्यात आले.

यावेळी प्राचार्य एस डी पाटील यांनी आपण आपल्याच या विधायक व रचनात्मक कार्यातून प्रेरणा घेऊन माजी विद्यार्थी मंच स्थापन केला. पहिली मदत आमच्यातर्फे खरडबारी येथील चक्रीवादळग्रस्तांना १६०१६ रुपयाची मदत देण्यात आली. आपल्या या विधायक उपक्रमातून विद्यार्थी पालक व शिक्षकांना निश्चितच प्रेरणा व प्रोत्साहन मिळेल, विद्यार्थी हे उद्याचे भविष्य आहेत. आपले प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिवसेना युवा उपाध्यक्ष चिंतामण ठाकरे, शालिग्राम जगताप, प्रभाकर जगताप, हरी सोनवणे, राजाराम बागुल, ऋषिकेश जगत, वसंत पवार, काळू माळचे, यशोदाबाई पवार, संगीता सूर्यवंशी, विमलबाई पवार, साखर जगताप, संगीता गायकवाड, अमोल पाटील माता पालक संघ यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## पाहिजेत

**कार्यालयीन/ऑफीस कामकाजाकरिता मराठी, इंग्रजी टंकलेखक तसेच संगणकाचे Tally,Execl, Word चे ज्ञान असलेले मुलगा/मुलगी कामकाजाकरिता तात्काळ पाहिजेत.**

: संपर्क :

**ॲड.विलास डी.झाल्टे/ ॲड.सिध्दांत व्ही.झाल्टे**

पत्ता: १५,१६ दिघे ॲडव्होकेट चेंबर्स, स्टेशन रोड, धुळे.

**मो:९१५६२६९९९९ भेटण्याची वेळ : १२ ते ६ पर्यंत**

CMYK

दैनिक
लक्ष महाराष्ट्र

सोमवार, दि. २८ ऑगस्ट २०२३





# सुभानदादा पिंजारीच्या वृक्षप्रेमातुन बहरला म्हसदीचा निसर्ग

















धुळे । एखादे वेड मनाशी लागले की त्याच वेडाने भारावून स्वतःला त्यात पूर्णपणे गुंतवून घेत समर्पित भावनेने काम करणाऱ्या व्यक्तीला सुरुवातीला समाज वेड्याच्या गणतीत काढतो. पण याकडे लक्ष न देता एकाच धेय्याने झपाटून काम करणाऱ्या व्यक्तींच्या हातून असे काही लक्षवेधी काम घडून जाते की त्यांना सुरुवातीला वेडे ठरविणारा समाजच त्यांना डोक्यावर घेऊन मिरवत त्यांच्या कौतुकाचे सोहळे साजरे करतो. असेच फार मोठे पवित्र कार्य साक्री तालुक्यातील म्हसदी येथील सुभानदादा पिंजारी यांच्या हातून घडत असून ते गावासह पंचक्रोशीत प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणून चर्चिले जात आहेत. त्यांचे कार्य सर्वांसाठीच अनुकरणीय ठरले आहे. सुभानदादांनी वृक्षप्रेमाने भारावून स्वतःला वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धन या कामात झोकून देत हजारो वृक्ष लावून ते जगविण्याची किमया साधत म्हसदी गावासह परिसर व रान हिरवेगार करून दाखविले आहे. सुभानदादांचा हा थोडक्यात कार्यवेध... निसर्गाविषयी आत्मीयता, सामाजिक भान व जाणीव यातून सुभानदादा पिंजारी यांना गेल्या अनेक वर्षांपूर्वी वृक्षलागवडीच्या कामाला सुरुवात केली.स्वतः रोपे विकत आणून त्याची लागवड करणे, खत घालणे व लावलेल्या झाडाला नियमितपणे पाणी देऊन ते जगविणे, त्याची देखभाल करणे हा त्यांचा दिनक्रम बनला. सुरुवातीला त्यांना काहींनी वेडात काढले. हे फॉरेस्टवाल्यांचे, वनीकरण विभागाचे काम हा वेडा माणूस स्वखर्चाने का करतो म्हणत लोकांनी हसण्यावर घेतले. सुभानदादांनी मात्र याकडे लक्ष न देता केवळ आपल्या धेय्यावर लक्ष केंद्रित करुन आपले काम नियमितपणे सुरु ठेवले. झाड लावण्यायोग्य जागा दिसली की तिथे झाड लावायचे व त्याला खतपाणी घालून देखभाल करीत ते जगवायचे या श्रद्धकार्याने 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' हा संतविचार त्यांनी कृतीत आणला. रस्त्याच्या दुतर्फा बाजूंनी, गावातील स्वामी समर्थ मंदिर, विविध जातीधर्मातील देवीदेवतांची मंदिरे, शाळा, गावठाण परिसर अशा अनेक ठिकाणी त्यांनी विविध जातींची झाडे लावून ती जगविली. झाडांना लेकरांसारखे सांभाळत, वाढवत त्यांना मोठे केले. त्यांच्या या कार्याने समाजाचे लक्ष वेधले गेले. सुभानदादांना लोक मानायला लागले. त्यांचा आदरसत्कार होऊ लागला.

संकलन : सचिन बागुल

दैनिक
लक्ष महाराष्ट्र

सोमवार, दि. २८ ऑगस्ट २०२३





# सुभानदादांच्या वृक्षलागवडीच्या चळवळीने खुलून दिसतो म्हसदी परिसर

## जंगल हद्दीत जाऊन वृक्षलागवड : परिसरात मिळतो निसर्गाचा सुखद अनुभव


















धुळे । सर्व जातीधर्मातील लोक सुभानदादाच्या कामाचा उदोउदो करू लागले. सुभानदादांनी म्हसदीचे ग्रामदैवत धनदाई देवीचा मंदिर परिसर व मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यालगत वृक्षलागवड केल्याने त्यांचे नाव पंचक्रोशीत चर्चिले जाऊ लागले. यातूनच सुभानदादांचा कार्यविस्तार वाढत गेला. सुभानदादांच्या कामाची दखल घेऊन गावातील व गावातून थेट विदेशात गेलेल्या काही दानशूरांनी त्यांना मदत दिली. या मदतीतून सुभानदादांचे काम मोठ्या स्वरूपात दिसू लागले. अलीकडेच काही वर्षांपूर्वी गावात दुष्काळ पडला होता. पावसाचे पाणी गावालगतच्या पांझरा नदीतून वाहून गेले. पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाले होते. पावसाचे पाणी गावालगतच्या पांझरा नदीतून वाहून गेले. विहिरींनी तळ गाठला. त्या पूर्णपणे आटल्या. २० दिवस गावाला पाणी मिळाले नाही. पाण्यासाठी गाव भटकंती करीत राहिले. सुभानदादांनी अशा वेळी गावकऱ्यांच्या मदतीने नदीचे खोलीकरण करून दोन बंधारे बांधले. पुढे झालेल्या पावसाने हे दोन्ही बंधारे भरले. विहिरींची पाण्याची पातळी ५० ते ६० फुटांपर्यंत वाढली. सुभानदादांच्या कर्मपुण्याईने गावाला रोज गावातील कब्रस्तानमध्ये असलेल्या विहिरीतून आज पाणीपुरवठा केला जात आहे. ही विहीर सुभानदादांच्या राष्ट्रीय एकात्मतेची मिसाल ठरली आहे. याच कब्रस्तानमध्ये सुभानदादांनी मोठ्या प्रमाणावर रोपे तयार केली असून संपूर्ण कब्रस्तान भरगच्च वृक्षराजींनी बहरला आहे. येथे विविध जातींची मोठमोठी झाडे असून इथे गेल्यावर थंडगार निसर्गाचा सुखद अनुभव येतो. याशिवाय सुभानदादांनी गावातून विविध गावांकडे जाणाऱ्या रस्त्यांच्या दुतर्फा तसेच थेट जंगल हद्दीत जाऊन वृक्षलागवड करून ते वाढविले आहेत. काही शेतकऱ्यांच्या शेतात देखील त्यांनी झाडे लावून दिली आहेत. गावाशेजारील असलेले डोंगर हिरवेगार करण्याचा विडा आता सुभानदादांनी उचलला आहे. त्यासाठी रस्ता कामाची मंजुरी देखील ट्युण्णी शासनाकडून मिळवून आणली आहे. त्यासाठी शासकीय निधीची गरज आहे. आतापर्यंत सुभानदादांच्या कार्याला अनेकदा गौरविण्यात आले आहे. परंतु शासन स्तरावर ना त्यांची दखल घेतली ना कुठला मानसन्मान मिळाला. सुभानदादांना याबद्दल काहीच खंत वाटत नाही व वृक्षारोपणाचे फोटोछाप कामही ते करीत नाहीत. सुभानदादांच्या या निस्वार्थ निसर्गसेवेच्या व मानवतावादी कामाला शासनाची मदतरूपी साथ मिळाली तर जगाचे लक्ष वेधू शकेल असे निसर्गाचे आदर्श मॉडेल साकारण्याची जिद्द सुभानदादांमध्ये आहे.

संकलन : सचिन बागुल